। लातूर । वर्ष ३४ वे । अंक २२३ वा । गुरूवार, दिनांक २७ नोव्हेंबर २०२५ । पृष्ठे ६ । किंमत १ रू.  RNI 47034/64

# लातूर समाचार

LATUR SAMACHAR

Email-dainiklatursamachar@gmail.com

(सांज दैनिक)
प्रकाशन: लातूर
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

संस्थापक : स्व.शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)   कार्यकारी संपादक : शिवाजी दयानंद जडे

# उदगीरच्या विकासाला महायुतीच गती देणार - मुख्यमंत्री फडणवीस




**मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत लातूर ग्रामीणचे काँग्रेसचे माजी आमदार त्रिंबक नाना भिसे, काँग्रेसचे माजी नगराध्यक्ष लक्ष्मण कांबळे यांनी यावेळी भाजपमध्ये उदगीर येथे प्रवेश केला.**

**उदगीर/प्रतिनिधी :** उदगीर येथे गुरूवारी झालेल्या भव्य जाहीर सभेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुतीच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन करत विकासाची हमी दिली आहे. प्राचीन इतिहास, आर्थिक व्यवहार आणि स्वातंत्र्य चळवळीत उदगीरच्या लढवय्या परंपरेचा उल्लेख करत त्यांनी शहराचे विशेष महत्त्व यावेळी अधोरेखित केले.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात विविध योजनांचा आढावा घेत जनतेचे लक्ष वेधले. ५० हजार कोटींची अटल योजना राज्यात उत्तमपणे सुरू असून, त्यातील १४० कोटी रुपयांचा पहिला टप्पा उदगीरकरांना मिळाला असल्याची माहिती त्यांनी दिली. राज्यातील प्रत्येक शहरात ही योजना वेगाने सुरू आहे, असेही ते म्हणाले.

उदगीरचे विकासपुरुष म्हणून ओळखले जाणारे संजयजी बनसोडे यांचे कौतुक करत मुख्यमंत्री म्हणाले की, महायुतीच्या सरकारकडून उदगीरचा



विकास मोठ्या प्रमाणात झाला आहे. अनेक प्रलंबित कामांना गती मिळाली आहे. यावेळी त्यांनी अतिरिक्त जिल्हाधिकारी कार्यालय, एसपी कार्यालय आणि एमआयडीसी मंजुरी लवकरच देण्याचे आश्वासन दिले. आयुष्मान आरोग्य मंदिर योजना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली मोठ्या प्रमाणात राबवली जात असल्याचा उल्लेख करत त्यांनी आरोग्यविषयक सुविधांमध्ये आणखी वाढ होणार असल्याचे सांगितले.

विरोधकांवर जोरदार टीका करत मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, जोपर्यंत मी मुख्यमंत्री आहे, तोपर्यंत लाडकी बहीण योजना कधीही बंद होणार नाही. उलट ती अधिक सक्षम होऊन महिलांना 'लखपती दीदी' बनवणे हे सरकारचे मोठे उद्दिष्ट आहे.

सभेच्या शेवटी त्यांनी महायुतीच्या नगरसेवक व नगराध्यक्ष पदाच्या उमेदवारांना प्रचंड बहुमताने निवडून देण्याचे आवाहन केले. दोन तारखेला तुम्ही आमच्या उमेदवारांची काळजी घ्या; पुढील पाच वर्षे आम्ही तुमची काळजी घेऊ, अशा शब्दांत त्यांनी भाषणाची सांगता केली. या सभेत हजरोंच्या संख्येने उदगीरकर उपस्थित होते. भव्य व्यासपिठावर अनेक विद्यमान आमदार, माजी आमदार तसेच भाजपाचे कार्यकर्ते उपस्थित होते. यातवेळी आमदार संभाजीराव पाटील, आमदार अभिमन्यू पवार, आमदार रमेशअप्पा कराड, आमदार संजय बनसोडे, सौ. आर्चनताई पाटील चाकूरकर, उदगीरमधील उमेदवारसह कार्यकर्त्यांनी गर्दी केली होती.

# अहमदपूरात भाजप-राष्ट्रवादीच्या शाब्दीक वादाच्या पार्श्वभूमीवर काँग्रेसचा जोरदार प्रचार

## महाविकास आघाडीचा दावा-विजय निश्चित

**अहमदपूर/प्रतिनिधी :** नगर परिषद निवडणुका अवघ्या तोंडावर येऊन ठेपल्या असताना अहमदपूरातील राजकीय वातावरण चांगलेच तापले आहे. भाजप व राष्ट्रवादीचे स्थानिक नेते एकमेकांवर आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झाडत असताना, काँग्रेस आणि महाविकास आघाडी मात्र एकसंघपणे प्रचाराच्या मैदानात उतरल्याचे चित्र दिसत आहे.

गत दोन दिवसांत भाजपचे माजी मंत्री संभाजीराव पाटील निलंगेकर, स्थानिक नेते गणेश हाके, दिलीपराव देशमुख आणि दुसरीकडे राष्ट्रवादीचे स्थानिक नेते व मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या वक्तव्यांमुळे वातावरण तापले. चक्क वस्त्रांवरील उपमा, प्राण्यांचे उदाहरण आणि वैयक्तिक टीका करत दोन्ही पक्षांनी एकमेकांवर निशाणा साधला जात आहे. यामुळे खालच्या दर्जाचे राजकारण सुरू असल्याची चर्चा शहरात रंगली आहे. या गोंधळात अहमदपूरची जनता विकासाऐवजी होत असलेल्या राजकीय वादांगांना कंटाळल्याचेही दिसत आहे.

दरम्यान, काँग्रेस नेते अमित देशमुख आणि जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे यांनी अहमदपूरातील जाहीर सभेत जोरदार शक्तिप्रदर्शन केले. महाविकास आघाडीचा विजय जवळपास निश्चित असल्याचा दावा त्यांनी केला. जनतेचा विकास फक्त महाविकास आघाडीच करू शकते, असे सांगत काँग्रेसचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार कलमुद्दीन शेख यांना मोठ्या मताधिक्याने निवडून देण्याचे आवाहन करण्यात आले.

महाविकास आघाडी-काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) आणि शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) या तीन पक्षांनी मिळून २५ उमेदवार निवडणुकीच्या शर्यतीत उभा आहेत. माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही आघाडी लढत असून महायुतीचे नेते जागावाटपासाठी भांडत आहेत, तर आम्ही जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी लढतो आहोत, असा टोला यावेळी लगावण्यात आला.

यापूर्वीच्या महाविकास आघाडीच्या काळात



आदरणीय विलासराव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली सिंचन प्रकल्प, शहर विकास योजना आणि विविध पायाभूत सुविधा उभारण्यात आल्याची आठवण करून देत, नागरिकांच्या तक्रारींकडे लक्ष देणारे कोणी नाही, असा आरोप करण्यात आला.

शहरातील पाणीपुरवठा, कचरा व्यवस्थापन, दिवाबत्ती, आरोग्य सुविधा, व्यापारी संकुल, बाग-बगीचे आणि शैक्षणिक वातावरण या सर्व प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी महाविकास आघाडीच सक्षम असल्याचा दावा नेत्यांनी सभेत केला. हाताचा पंजा, तुतारी आणि मशाल या चिन्हांसमोरील बटण दाबून उमेदवारांना विजयी करण्याचे आवाहन करण्यात आले.

या सभेस खासदार डॉ. शिवाजी काळगे, माजी राज्यमंत्री विनायकराव पाटील, नांदेडचे माजी महापौर अब्दुल सत्तार, काँग्रेस जिल्हाध्यक्ष अभय साळुंखे, शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी रेड्डी आदींसह लातूर-अहमदपूर तालुक्यातील अनेक मान्यवर नेते उपस्थित होते. अहमदपूरातील राजकीय तापमान निवडणुकीच्या अखेरच्या टप्प्यात आणखी चढणार, असे संकेत मिळत आहेत. शहरातील वादांचा गोंधळ आणि महाविकास आघाडीचा वाढता जोर या दोन्हींच्या पार्श्वभूमीवर अंतिम निकालाकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जयक्रांती सेमी इंग्लिश स्कूलमध्ये संविधान दिन साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** जयक्रांती सेमी इंग्लिश स्कूल लातूर मध्ये मोठ्या उत्साहात संविधान दिन साजरा करण्यात आला. संविधान काय आहे त्याची निर्मिती कशी झाली याची सविस्तर माहिती देऊन, संविधानाचे सामुहिक वाचन करण्यात आले. संविधान दिन हा २६ नोव्हेंबर रोजी भारतभर साजरा केला जातो. २९ ऑगस्ट १९४७ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या नेतृत्वाखाली भारतीय संविधानाच्या निर्मितीसाठी मसूदा समिती स्थापन झाली. अनेक बैठका व चर्चासत्रांनंतर या समितीने सादर केलेला अंतिम मसुदा २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने स्वीकारला.त्यामुळे २६ नोव्हेंबर हा दिवस संविधान दिन म्हणून साजरा केला जातो.असे सविस्तर मार्गदर्शन गिरीश रंदाळे यांनी केले.यावेळी प्राचार्य प्रशांत घार पर्यवेक्षक तानाजी घाटके यांची उपस्थिती होती.

संविधान दिनानिमित्त विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते यावेळी सांस्कृतिक विभागप्रमुख डॉ.गणपत माने,नंदकिशोर माळी, डॉ. सुशिल शिंदे, विश्वनाथ सिंधीकुमठे,संभाजी वारकड,अमर येळंबकर, रामदास लातूरे,संगमेश्वर भेंडेगावे,गजानन घोंगडे,नीता तांभाळे, तुलसी तपसाळे, राशिनकर मॅडम,पाटील मॅडम,बनसोडे,आकाश लोहार,अभिषेक जाधव आदिनी उपस्थित राहून कार्यक्रम यशस्वी केला.

# भारतीय संविधान लोकशाहीचा आत्मा; लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये संविधानाचा जागर



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर येथील राजा नारायण लाहोटी इंग्लिश स्कूलमध्ये संविधान दिनानिमित्त भारतीय संविधानाचे व भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन शाळेचे प्राचार्य कर्नल श्रीनिवासूलू, माध्यमिक समन्वयक मनोहर कबाडे, प्राथमिक विभाग प्रमुख अरुल सेल्वी यांच्या हस्ते करण्यात आले. शौर्य निलंगेकर, नीलकृष्ण राठी, अभया साळुंके या विद्यार्थ्यांनी भारतीय संविधानाविषयी माहिती सांगितली. संविधानाच्या प्रस्ताविकेचे वाचन इंग्रजी विभाग प्रमुख राणी आमले यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रियांश राठी व आरव बियाणी या विद्यार्थ्यांनी केले. यावेळी सर्व शिक्षकवृंद, विद्यार्थी उपस्थित होते.

# घरकुल कामे वेळेत पूर्ण करावेत: खरोसा येथील दौऱ्यात प्रकल्प संचालक संजय इंगळे यांनी दिल्या सूचना

**औसा/प्रतिनिधी :** प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत सुरू असलेल्या घरकुल कामांची गती वाढवण्यासाठी प्रकल्प संचालक संजय इंगळे यांनी सहाय्यक प्रकल्प अधिकारी पाटील यांच्यासह आज औसा तालुक्यातील खरोसा येथे प्रत्यक्ष भेट देऊन चालू व प्रलंबित कामांची पाहणी केली. त्यांनी लाभार्थ्यांशी संवाद साधून कामांमधील अडचणी समजून घेतल्या.



या पाहणीदरम्यान, काही लाभार्थींनी पहिला हप्ता मिळूनही काम सुरू न केल्याचे इंगळे यांच्या निर्दशनास आले. त्यांनी संबंधितांना तात्काळ आणि दर्जेदार काम सुरू करण्याचे स्पष्ट निर्देश दिले. निधी वितरण आणि पेमेंट प्रणालीतील बदलांमुळे कामांची गती मंदावल्याचे इंगळे यांनी मान्य केले. मात्र, 'स्पर्श पेमेंट प्रणाली' लवकरच पूर्ण क्षमतेने कार्यान्वित होईल आणि सर्व हप्ते वेळेत वितरित केले जातील, असा ठोस विश्वास त्यांनी नागरिकांना दिला. लाभार्थींनी कोणतीही आर्थिक चिंता न करता तांत्रिक निकषांनुसार बांधकाम सुरू ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले. त्यांनी प्रकरणे नोंदवून सूचना दिल्या.

प्रधानमंत्री आवास योजनेतील कामांना गती प्रकल्प संचालक संजय इंगळे यांनी औसा येथील खरोसा गावाला भेट देत घरकुल कामांची पाहणी केली. निधी मिळूनही काम न करणाऱ्या लाभार्थींना तात्काळ बांधकाम सुरू करण्याचे निर्देश दिले. त्यांनी 'स्पर्श पेमेंट प्रणाली' लवकरच पूर्ण क्षमतेने सुरू होऊन उर्वरित हप्ते वितरित होतील, असे आश्वासन दिले. वेळेत आणि दर्जेदार काम करण्यासाठी लाभार्थींनी तांत्रिक निकषांचे पालन करावे, असे आवाहन त्यांनी केले.

## कुजबुज

-डॉ. संजय जमदाडे



**वाळू तस्करी करणाऱ्या वाहनांचा परवाना रद्द करण्यात येणार...**

## चिमटा दयाचा



**कोयत्याचा राडा लातूरमध्ये दिसत आहे!**
**पुण्याचा कोयत्याचा राडा लातूरमध्ये पोंहचला आहे !!**
**दहशद पसविणाऱ्याचा बंदोबस्त करण्याची गरज आहे !!!**

# कोकणगामध्ये १५ हजार भाविकांच्या उपस्थितीत चंपाषष्ठी:५ शतकांची परंपरा, पालखी, काठी, वारू यांची ढोल-ताशांच्या गजरात मिरवणूक

**अहमदपूर/प्रतिनिधी :** अहमदपूर तालुक्यातील कोकणगा येथे ५०० वर्षांची गौरवशाली परंपरा लाभलेल्या श्री खंडोबा देवस्थान जेजुरी अवतार मंदिराची चंपाषष्ठी यात्रा मोठ्या उत्साहात संपन्न झाली. मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी म्हणजेच चंपाषष्ठी. याच दिवशी भगवान खंडोबाने मल्ल आणि माणि राक्षसांचा संहार करून धर्मरक्षण केले होते, त्यामुळे हा दिवस खंडोबा भक्तांसाठी अत्यंत पवित्र मानला जातो.

यंदाच्या यात्रेत 'येळकोट येळकोट जय मल्हार'च्या जयघोषात हजारो भाविकांनी सहभागी होत पालखी व काठीचे दर्शन घेतले. पालखीचे मानकरी बालाजी कच्छवे आणि काठीचे मानकरी वेंकटी कच्छवे यांच्या निवासस्थानापासून निघालेल्या मिरवणुकीत शेकडो 'वारू' आणि



भाविकांनी खोबरे-भंडाऱ्याची उधळण केली. सकाळी देवाची विशेष पूजा करून ढोल-ताशे, हलगीच्या गजरात आणि पारंपरिक नृत्य करणाऱ्या भक्तांच्या उत्साहात सोहळ्याची सुरुवात झाली. या मिरवणुकीत स्थानिक ग्रामस्थांचा सहभाग लक्षणीय होता, त्यांनी मोठ्या भक्तिभावाने रस्ते आणि परिसर स्वच्छ ठेवला होता.

दिवसभरात महाराष्ट्र, कर्नाटकातून आलेल्या १५ हजारांहून अधिक भाविकांनी श्री खंडोबाचे दर्शन घेतले आणि साहेबराव लिंबाजी शेळके यांनी आयोजित केलेल्या महाप्रसादाचा लाभ घेतला. मंदिरात आजही पुजाऱ्यांची सहावी पिढी ५०० वर्षांची पूजा परंपरा श्रद्धेने जपत आहे, ही गावाची अभिमानास्पद बाब आहे. मंदिराच्या व्यवस्थापनाने भाविकांसाठी पिण्याचे पाणी आणि दर्शन रांगेची उत्तम सोय केली होती. संध्याकाळी वाघ्या-मुरळींच्या कार्यक्रमाने यात्रेची रंगत वाढली. ही यात्रा श्रद्धा आणि सांस्कृतिक वैभवाची सुंदर सांगड घालणारे एक महत्त्वपूर्ण ठिकाण म्हणून ओळखली जाते.कोकणगावातील श्री खंडोबा मंदिराची यात्रा ५०० वर्षांची परंपरा जपणारी आहे. त्यामुळे याला विशेष महत्त्व असल्याचे भाविकांकडून सांगितले जाते.

कोकणगा यात्रा सोहळ्याची वैशिष्ट्ये या यात्रेमध्ये हजारो भाविकांनी 'येळकोट येळकोट जय मल्हार'चा गजर केला. परंपरागत पालखी, सबिना काठी आणि वारू यांची मिरवणूक हे मुख्य आकर्षण होते. पालखीचे मानकरी बालाजी कच्छवे, तर काठीचे मानकरी वेंकटी कच्छवे हे होते. दिवसभरात १५ हजारांहून अधिक भाविकांनी दर्शन घेतले आणि महाप्रसादाचा लाभ घेतला. संध्याकाळी वाघ्या-मुरळींच्या कार्यक्रमाने यात्रेची सांगता झाली.

यात्रा समाजाला एकत्र आणणारा भक्तीचा उत्सव चंपाषष्ठीची कोकणगाव येथील यात्रा केवळ धार्मिक विधी नव्हे, तर समाजाला एकत्र आणणारा भक्तीचा उत्सव. खंडोबाच्या कृपेने समाधान, शांती व शौर्य मिळते असा भाव भाविकांच्या मनात दृढ असून परंपरागत श्रद्धेचा दिवा शतकानुशतके अखंड प्रज्वलित ठेवण्याची जबाबदारी कोकणगा गाव अतिशय निष्ठेने पार पाडत आहे.हजारो भाविकांच्या उपस्थितीमध्ये हा झालेला चंपाष्टमीचा हा सोहळा भारतीय परंपरेचे एक आगळे वेगळे रूप होते.

**– बालाजी शिवलिंग कच्छवे,**
**मंदिर कमिटी अध्यक्ष.**


ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## दहशतवाद्याचा त्रास भारताला

भारत जागतिक स्तरावर कितीही दहशदतवाद्याच्या विरोधात आवाज उठविला तरी त्याला फारसाप्रतिसाद मिळत नाही. सर्वाधिक झळ ही भारताला बसत आहे. त्यामुळे समुळ दहशदवाद नष्ट करावयाचा झाला तर पाकिस्तानला आर्थिक कोंडीत पकडले पाहिजे. पाकिस्तानमधील अतिरेकी कॅम्पस उद्धस्थ केले पाहिजेत. इतर देश जसे कार्यरत राहातात तसे वागले पाहिजे. धर्माच्या आडून हिंसक काम करणारे आता उघडे पडले आहेत. बरेच इतर देशाला झळ बसली नाही म्हणून गप्प आहेत. अमेरिकेची मदत पाकिस्तानला मिळत असल्याने पाकिस्तान उड्या मारत आहे. ज्यावेळी वर्ल्ड टावर पाडले त्यावेळी अमेरिकेने पाकमध्ये घूसून ओसामा बिन लादेन याचा खातमा केला होता. त्याला समुद्राखाली पुरले होते ही बाब माहिती असताना अमेरिकेचे ट्रम्प लाड करीत असतात. पुन्हा एकदा पाकिस्तानी अतिरेक्यांनी हात दाखविला तर ट्रम्प यांचे डोळे उघडतील. तो पर्यंत एकीकडे भारताबरोबर आपुलकी दाखवितील, पाकिस्तानला काही बोलणार नाहीत असा दुहेरी डाव अमेरिका करीत आहे. मुळात भारताचे आता कोठे कणखर धोरण स्विकारले आहे. ज्यावेळी जम्मू-काश्मीरमधून हिंदू पंडीताचे पलायन सुरु होते. हिंदुची विटंबना होते त्याच वेळी लक्ष देऊन पाकिस्तानी दहशदवातला वटणीवर आणले असते तर आज घुसखोरी मंदावली असती. आजही मोठ्या प्रमाणात जर कडक धोरण आवलंबले तर अनेक भारतात लपून असलेले अतिरेकी त्यांचे साथीदार सापडतील. भारतात कडक व्यक्तीकडून तपासणी होत नाही. कोणीही भारतात यावे व मुदत संपले तरी राहावे. भारतात गुण्यागोविंदाने राहात नाहीत तर विध्वंसक कार्यात गुंतलेले असतात. जम्मूकाश्मीरातून हिंदूच पलायन का रोखता आले नाही. हिंदुची हत्त्या होत असताना रोखले नाही? त्याचा परिणाम आगामी काळात दहशदतवाद्याशी हीतसंबंध असलेले या भागात मोठ्या प्रमाणात राहीले. त्यांनी दुष्कर्म करणाऱ्यास साथ दिली व देत असल्याचे उघड होत आहे. दहशदवाद्यास आश्रय कोणी दिला व कोण देत आहेत हे भारताला माहिती नाही असे नाही. मतासाठी काही प्रांत डोळे झाकून काम करीत आहेत. त्यांना चांगले माहिती आहे की, दहशतवाद्याचे संबंध देशात किती प्रमाणात विखुरलेले आहेत याचा अंदाज भारतीयांना नसेल. एवढे नेटवर्क असल्याचे नुकतेच दिल्लीतील स्फोटानंतर कळून येऊ शकते. दिल्लीतील घटना ही साधी नाही. यापासून कितीतरी शिकले पाहिजे. अनेक अंदाज येऊ शकतात. तरी आपल्यादेशात मुदत संपल्यानंतर न परतणारे किती परदेशीय आहेत याचा अंदाज घेतला जात नाही. केवळ वरचेवर चौकशी केली जाते तीही कालांतराने चौकशी प्रक्रिया बंद पडते. काही दिवसापुर्वी महाराष्ट्रात किती घुसखोर आहेत. त्यांना पाकिस्तानात पाठविण्याचा विचार जाहिर केला. यावेळी एकच वादळ निर्माण झाले. भारत-पाक बॉर्डरवर मोठी गर्दी दिसून आली. नंतर ही बाब थंडावली. जे घुसखोर आहेत त्यांना ही आता माहिती झाले की, भारत हा पक्का धोरणाचा नाही. ठोस कारवाई करीत नाही हे ओळखल्याने दिल्लीत अप्रिय घटना घडली. पंतप्रधानाच्या मजबुत धोरणामुळे देशात बॉम्बस्फोट होत नसले तरी अतिरेकी वेगळा विचार करून मोठ्या प्रमाणात विध्वंसक कसा होईल याचा शोध घेत आहेत. त्यामुळे अतिघातक बाबी बनविल्या आहेत. भारतात राहून भारताविरोधात काम करणारे शोधणे आवघड असेल तर अशा प्रकाराला काय म्हणावे? स्फोट घडल्यावर अनेक बाबीचा उलगडा झाला मात्र त्यापुर्वी दहशतवादी हाती लागले पाहिजे होते. आता अतिरेकी यांचा मनसुबा भयाण आहे. काही क्षणात जीवास हानी पोंहचेल असे कृत्य हाती आहेत. अतिप्रखर स्फोटकाची निर्मिती केल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे अतिरेक्याचा कट कसा आहे याची प्राथमिक माहिती मिळाली आहे तरी त्यांचे देशातील लागेबांधे उघड होत नाहीत हे मोठे दुदैव आहे. देशातील स्थानिकांच्या मदतीशिवाय काही बाबी साध्य होत नसतात. आलिगड, फरीदाबाद असे जे ठिकाण आहेत या बाबत सतत माहिती घेणे अपेक्षित होते. कोणतीही यशस्वी कारवाई होण्यासाठी स्थानिकांचा पाठींबा, मदतीशिवाय शक्य नाही हे सत्य आहे. काही बाबी सर्वांना कळतात. तरी भारतीय यंत्रणेतील बिघाड कधी सुधारेल ही संशोधानाची बाब आहे. त्यामुळे प्रत्येक भारतीय नागरिक हा जासूस बनला पाहिजे. भारतीय समाज हा मवाळ आहे. एकीनाही, भिऊन राहातो त्याचा फायदा परदेशीय घुसखोरी घेत आहेत हे उघड दिसून येत आहे. त्यामुळे भारतीय राज्यकर्त्यांनी देशाप्रती प्रेमभावना कमी होता कामा नये. एकदा देशात शोध माहिम चालू केली पाहिजे. सर्वे हा सर्वात महत्वाचा आहे. कोणी लपून बसले असेल किंवा देशात राहाण्याची मुदत संपली असेल तर त्याचा शोध मोहिमेत सापडतील. त्याच प्रमाणे आरोग्याची तपासणी व उपचारासाठी अनेक जन भारतात येतात, ते परत जाणे विसरून जातात. आज पाकिस्तानी नातेसंबंध असणारे मोठ्या प्रमाणात आहेत. तसे सापडतील. त्यामुळे वेळीच भारताने सावध असले पाहिजे. वेळीच काही निर्णय घेतले पाहिजेत. आज प.बंगालमध्ये काय स्थिती आहे. एसआयआर मुळे अनेक सापडत आहेत. एका व्यक्तीकडे अनेक आधारकार्ड मिळत आहेत. मृत्यू झालेल्या व्यक्तीचा फोटो जीवंत व्यक्तीचा लावुन जगत आहेत. असे अनेक किस्से उघडे पडत आहेत. अशा घटना भारतात घडत असून इतर प्रांतातील राज्यकर्ते गप्प कसे? वेळीच सावध असले पाहिजे. घुसखोरी वाईट बाब आहे. व्यापारी म्हणून आलेले ब्रिटीश राज्यकर्ते बनले हा अनुभव फार काही जुना नाही. त्यामुळे पाकिस्तानी घुसखोरी आले व त्यांनी स्थानिक नातेसंबंधाच्यामदतीने राज्यकर्ते बनणे तसे आवघड नाही. लोकशाहीचे मुल्यावर आधारीत सहज सत्ता हाती घेता येवू शकते. त्यामुळे पुन्हा गुलामगिरीत जावू नये असे वाटत असेल तर आहे त्या स्थितीत शोध मोहिमेची गरज आहे. शोधाल तर सापडेल. त्यानुसार किमान शोधणे हे कर्तव्य आहे. नसता आगामी काही वर्षात वाईट बाब घडण्याची शक्यता आहे. जे देशात घडते ते पाहून दहशतवादाचा त्रास भारताला आहे. झळ भारत सहन करीत आहे. त्यामुळे ही समस्या एकट्या भारताने सोडविली पाहिजे. याला भारतीय जनतेचा पाठींबा आवश्यक आहे.

# रक्तातील साखर कमी करण्याचे १३ मार्ग




एकूणच आरोग्यासाठी रक्तातील साखरेची पातळी निरोगी ठेवणे अत्यंत महत्त्वाचे आहे. जेव्हा रक्तातील साखरेची पातळी सतत जास्त असते, तेव्हा कालांतराने मधुमेह आणि हृदय व रक्तवाहिन्यासंबंधी रोगांसारख्या गुंतागुंत निर्माण होऊ शकतात. या ब्लॉगमध्ये, आम्ही प्रभावी धोरणांचा शोध घेऊ - सोप्या पण प्रभावी - ज्या तुम्हाला तुमच्या रक्तातील साखरेची पातळी नैसर्गिकरित्या कमी करण्यास आणि व्यवस्थापित करण्यास मदत करू शकतात.

**रक्तातील साखर कमी करण्याचे १३ मार्ग**

कार्बोहायड्रेट सेवनाचे निरीक्षण करा

रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यासाठी कार्बोहायड्रेटचे सेवन नियंत्रित करणे महत्त्वाचे आहे. कार्बोहायड्रेट्स ग्लुकोजमध्ये मोडतात, ज्याचा थेट रक्तातील साखरेवर परिणाम होतो. संपूर्ण धान्य, भाज्या आणि शेंगा यांसारख्या जटिल कार्बोहायड्रेट्सचे सेवन करण्यावर लक्ष केंद्रित करा, जे अधिक हळूहळू पचतात आणि साध्या साखरेच्या तुलनेत रक्तातील साखर हळूहळू वाढवतात.

**फायबरचे सेवन वाढवा**

फायबरयुक्त पदार्थ रक्तातील साखरेचे शोषण कमी करून रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत करतात. ब्रोकोली, बेरी आणि ओट्स सारखे पदार्थ निवडा, जे केवळ फायबरने समृद्ध नसून आवश्यक पोषक तत्वांनी देखील समृद्ध असतात.

**हायड्रेट केलेले राहा**

पुरेसे पाणी पिल्याने तुमच्या मूत्रपिंडांना जास्तीची साखर मूत्रमार्गे बाहेर काढण्यास मदत होते. डिहायड्रेशनमुळे रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते, म्हणून दिवसभर भरपूर पाणी पिण्याचा प्रयत्न करा. साखरयुक्त पेये टाळा आणि त्याऐवजी पाणी किंवा हर्बल टी निवडा.

**नियमित व्यायाम करा**

**दुसरा मत**

शारीरिक हालचालींमुळे तुमच्या स्नायूंना उर्जेसाठी ग्लुकोजचा वापर करण्यास मदत होते आणि इन्सुलिन संवेदनशीलता सुधारते, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी कमी होण्यास मदत होते. आठवड्यातील बहुतेक दिवस किमान ३० मिनिटे मध्यम-तीव्रतेचा व्यायाम करा. तेज चालणे, सायकलिंग किंवा नृत्य यासारख्या क्रियाकलाप उत्तम पर्याय आहेत.

**ताण व्यवस्थापित करा**

तणाव संप्रेरकांमुळे रक्तातील साखरेची पातळी वाढू शकते. ताणतणावाची पातळी नियंत्रणात ठेवण्यासाठी आणि रक्तातील साखरेचे नियंत्रण चांगले ठेवण्यासाठी खोल श्वास घेणे, ध्यान करणे किंवा योगासने करणे यासारख्या ताण-व्यवस्थापन तंत्रांचा सराव करा.

**पुरेशी झोप घ्या**

झोपेचा अभाव तुमच्या शरीराच्या रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्याच्या क्षमतेत व्यत्यय आणू शकतो, ज्यामुळे इन्सुलिन प्रतिरोधकता वाढते आणि रक्तातील साखरेची पातळी वाढते. रक्तातील साखरेचे नियंत्रण उत्तम राहण्यासाठी दररोज रात्री ७-९ तासांची दर्जेदार झोप घ्या.

**कमी ग्लायसेमिक इंडेक्स असलेले पदार्थ निवडा**

ग्लायसेमिक इंडेक्स हे अन्न रक्तातील साखरेची पातळी किती लवकर वाढवते हे मोजते. कमी ग्लायसेमिक इंडेक्स असलेले अन्न रक्तप्रवाहात ग्लुकोज अधिक हळूहळू सोडतात, ज्यामुळे रक्तातील साखरेची पातळी स्थिर राहण्यास मदत होते. उदाहरणांमध्ये संपूर्ण धान्ये, शेंगा आणि स्टार्च नसलेल्या भाज्यांचा समावेश आहे.

**अपॉइंटमेंट हवी आहे का?**

जेवणानंतर रक्तातील साखरेचे प्रमाण नियंत्रित केल्याने रक्तातील साखरेची वाढ रोखण्यास मदत होते. जास्त खाणे टाळण्यासाठी आणि दिवसभर रक्तातील साखरेची पातळी स्थिर ठेवण्यासाठी लहान प्लेट्स वापरा, सर्व्हिंगचा आकार मोजा आणि जाणीवपूर्वक खाण्याचा सराव करा.

**जेवणात प्रथिने समाविष्ट करा**

तुमच्या जेवणात चिकन, मासे, टोफू किंवा शेंगा यांसारखे लीन प्रोटीन स्रोत समाविष्ट केल्याने ग्लुकोजचे शोषण कमी होण्यास आणि रक्तातील साखरेचे नियंत्रण सुधारण्यास मदत होते. प्रथिने पोटभरेपणाची भावना देखील वाढवतात, ज्यामुळे जास्त खाणे टाळता येते.

**जेवण नियमित ठेवा**

नियमित वेळेवर जेवण केल्याने तुमच्या शरीराचे अंतर्गत घड्याळ समक्रमित होऊन रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित होण्यास मदत होते. जेवण वगळणे टाळा, ज्यामुळे रक्तातील साखरेचे प्रमाण चढ-उतार होऊ शकते आणि दिवसाच्या शेवटी जास्त खाणे होऊ शकते.

**अल्कोहोलचे सेवन मर्यादित करा**

अल्कोहोल रक्तातील साखरेच्या नियमनात व्यत्यय आणू शकते आणि रक्तातील साखरेची पातळी अनपेक्षितपणे वाढू किंवा कमी होऊ शकते. जर तुम्ही मद्यपान करायचे ठरवले तर ते माफक प्रमाणात आणि नेहमी अन्नासोबत करा जेणेकरून रक्तातील साखरेवरील त्याचा परिणाम कमी होण्यास मदत होईल.

**नैसर्गिक परिशिष्टांचा विचार करा**

दालचिनी आणि क्रोमियम सारख्या काही नैसर्गिक पूरकांचा रक्तातील साखरेची पातळी कमी करण्याच्या त्यांच्या संभाव्य फायद्यांसाठी अभ्यास करण्यात आला आहे. तथापि, कोणतेही पूरक आहार सुरू करण्यापूर्वी ते तुमच्यासाठी सुरक्षित आणि प्रभावी आहेत याची खात्री करण्यासाठी तुमच्या आरोग्य सेवा प्रदात्याचा सल्ला घ्या.

**रक्तातील साखरेच्या पातळीचे निरीक्षण करा**

रक्तातील साखरेच्या पातळीचे नियमित निरीक्षण करणे आवश्यक आहे, विशेषतः जर तुम्हाला मधुमेह असेल किंवा तुम्हाला धोका असेल तर. तुमच्या प्रगतीचा मागोवा घेण्यासाठी आणि तुमच्या जीवनशैलीत किंवा उपचार योजनेत आवश्यक समायोजन करण्यासाठी तुमच्या आरोग्य सेवा प्रदात्याने शिफारस केल्यानुसार घरगुती ग्लुकोज मॉनिटर वापरा.

उच्च साखर पातळीच्या आपत्कालीन परिस्थिती टाळण्यासाठी टिप्स

**आणीबाणीची योजना ठेवा**

उच्च रक्तातील साखरेच्या आपत्कालीन परिस्थितीचे व्यवस्थापन करण्यासाठी एक योजना विकसित करा, ज्यामध्ये लक्षणे ओळखणे आणि घ्यावयाच्या पावले (उदा. रक्तातील साखरेची पातळी तपासणे, लिहून दिल्यास इन्सुलिन देणे, आवश्यक असल्यास वैद्यकीय मदत घेणे) यांचा समावेश आहे.

**कॉन्टिनेन्टल हॉस्पिटल्सशी सल्लामसलत**

उच्च रक्तातील साखरेच्या आपत्कालीन परिस्थितीचे व्यवस्थापन करण्यासाठी वैयक्तिकृत मार्गदर्शन आणि उपचार पर्यायांसाठी, कॉन्टिनेंटल हॉस्पिटल्सचा सल्ला घ्या. ते व्यक्तींना त्यांच्या रक्तातील साखरेची पातळी प्रभावीपणे व्यवस्थापित करण्यास आणि स्थिर करण्यास मदत करण्यासाठी विशेष काळजी आणि समर्थन देतात.

**निष्कर्ष**

तुमच्या दैनंदिन दिनचर्येत या १३ व्यावहारिक धोरणांचा समावेश करून, ग्रीन टीचे फायदे विचारात घेऊन आणि कॉन्टिनेंटल हॉस्पिटल्सकडून तज्ञांचा सल्ला घेऊन, तुम्ही रक्तातील साखरेची पातळी कमी करण्यासाठी आणि ती राखण्यासाठी सक्रिय पावले उचलू शकता. लक्षात ठेवा, लहान बदल तुमच्या एकूण आरोग्यात आणि कल्याणात मोठा फरक करू शकतात.

# रोजच्या आहारात 'या' १० पदार्थांचा करा समावेश, रक्तातील साखर राहील नियंत्रणात



बदलेली जीवनशैली, चुकीचा आहार यामुळे आजकाल मधुमेहाची समस्या होत आहे. मधुमेहाला 'सायलेंट किलर' म्हटले जाते. ते तुमच्या शरीराला आतून हानी पोहोचवते. पण तुमच्या दैनंदिन आहारात काही पदार्थांचा समावेश करून तुम्ही या गंभीर आजारावर नियंत्रण मिळवू शकता. इतकेच नव्हे तर हे पदार्थ तुम्हाला मुबलक पोषण देखील देतील.

**कढीपत्ता-**

कढीपत्ता मधुमेह नियंत्रित करण्यास उपयुक्त आहे. तुम्ही ते हर्बल चहामध्ये घालून किंवा तुमच्या जेवणाच्या मसाल्यात घालून खाऊ शकता. हे पदार्थ जेवणाची चव वाढवतात. आणि आरोग्य फायदेसुद्धा देतात.

**नारळ-**

नारळाच्या पाण्यात मॅग्नेशियम असते. जे इन्सुलिन संवेदनशीलता सुधारते. त्याचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी आहे. ज्यामुळे ते रक्तातील साखर नियंत्रित करते.

**जांभूळ-**

मधुमेह असलेल्या लोकांसाठी जांभूळ हे सर्वोत्तम फळ आहे. हे रक्तातील साखर नियंत्रित करते. त्यामुळे गोड खाण्याची इच्छाही कमी होते.

**मूग-**

प्रथिने समृद्ध असलेले मूग रक्तातील साखरेची पातळी कमी करते. हे खाल्ल्याने ऊर्जा टिकून राहण्यास मदत होते. मूग पोट बराच वेळ भरलेले ठेवतात. ज्यामुळे वजन नियंत्रित राहण्यास मदत होते.

**हळद-**

हळद खूप आरोग्यदायी आहे. हे दररोज भाज्यांमध्ये घालून खा. मधुमेह नियंत्रित करण्यासाठी, आवळ्यासोबत त्याचे सेवन करणे चांगले.

**ज्वारी-**

मधुमेहाच्या रुग्णांसाठी ज्वारी हे सर्वोत्तम धान्य आहे. ते ग्लूटेन मुक्त आहे. ज्यामुळे रक्तातील साखर कमी होते. जास्त फायबरमुळे ते खूप पौष्टिक देखील आहे.

**आवळा-**

व्हिटॅमिन सी समृद्ध आवळा मधुमेह नियंत्रित करतो. त्यामुळे तुमचा थकवा कमी होतो. ते तुमच्या आहारात रस किंवा पावडरच्या स्वरूपात समाविष्ट करा.

डाळिंब-

जर तुम्हाला मधुमेह असेल आणि तुम्ही गोड पदार्थांचेही शौकीन असाल तर डाळिंब हा तुमच्यासाठी एक चांगला पर्याय आहे. हे मधुमेह नियंत्रित करेल, पोषण देईल आणि गोडवा देखील देईल.

**अळशी-**

अळशीमुळे इन्सुलिनची संवेदनशीलता सुधारते. यामुळे रक्तातील साखर नियंत्रणात राहते. याशिवाय, ते हृदयाच्या समस्या देखील दूर करते. ते जेवणात मिसळा किंवा माउथ फ्रेशनर म्हणून खा.

# फक्त इतकी वर्षे असते एसीचे आयुष्य, यापेक्षा जास्त वापरल्यास त्याचा होऊ शकतो स्फोट



एसी स्फोटाच्या घटना समोर आल्यापासून एसी वापरणारा प्रत्येक माणूस घाबरला आहे. एसी का फुटतात माहीत आहे का एसी युनिटच्या स्फोटामागील कारणांमध्ये एसीचा निष्काळजी वापर समाविष्ट आहे. त्यामुळे साहेब, घाबरून काहीही होणार नाही, जर तुम्हाला एसी ब्लास्टपासून वाचवायचे असेल, तर तुम्हाला काही महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरे माहित असणे आवश्यक आहे.

पहिला प्रश्न म्हणजे जुना एसी किती वर्षांनी बदलायचा आणि दुसरा प्रश्न, अशा कोणत्या चुका आहेत ज्यामुळे एसीमध्ये स्फोट होण्याचा धोका वाढतो. एसी ब्लास्टचा धोका कमी करायचा असेल, तर कोणत्या महत्त्वाच्या गोष्टी लक्षात ठेवायला हव्यात ते जाणून घेऊया.

एसी घेतला तर वर्षानुवर्षे चालवत राहता येईल, असे नाही. अर्थात, जुना एसी चालवण्यापासून तुम्हाला कोणी रोखत नाही, पण एक वेळ अशी येते की तुम्ही स्वत:ला थांबवावे. एसी बदलण्याची वेळ कधी येते, याबद्दल कंपन्यांचे काय मत आहे ते जाणून घेऊया

एसी उत्पादक कंपन्या विंडो एसी मॉडेल्ससह ५ वर्षापर्यंत कंप्रेसर वॉरंटी आणि स्प्लिट एसीसह १० वर्षांपर्यंत कंप्रेसर वॉरंटी देतात. वॉरंटी तपशील पाहिल्यास कंपनीला त्याच्या उत्पादनाच्या आयुष्यावर किती विश्वास आहे हे दिसून येते.

कंपन्यांचा विश्वास आहे की विंडो एसीचा कंप्रेसर ५ वर्षे आरामात चालू शकतो आणि स्प्लिट एसीचा कंप्रेसर १० वर्षे आरामात चालू शकतो. कोणतीही कंपनी जास्त वॉरंटी देऊन नुकसान करू इच्छित नाही. याचा अर्थ विंडो एसीचे आयुष्य ५ वर्षे किंवा ६ वर्षांपर्यंत असू शकते, तर स्प्लिट एसीचे आयुष्य १० वर्षांपर्यंत असू शकते.

जर तुम्ही पहिल्या दिवसापासून वॉरंटी कालावधीपर्यंत एअर कंडिशनरची योग्य प्रकारे सर्व्हिस केली नसेल, तर वॉरंटी कालावधीतही एसी फुटण्याचा धोका असू शकतो. जर तुम्ही एसीची योग्य काळजी घेतली नाही, तर वॉरंटी कालावधी (कंप्रेसर वॉरंटी) संपल्यानंतर जुना एसी बदला.

जर तुम्हाला पहिल्या दिवसापासून एसी ची सेवा योग्य प्रकारे आणि वेळेवर मिळत असेल, तर तुम्हाला कोणतीही अडचण येणार नाही आणि वॉरंटी संपल्यानंतरही तुम्ही जोपर्यंत एसी चालवू शकता, तोपर्यंत एसी मोठ्या खर्चाची मागणी करत नाही. ज्या दिवशी तुम्हाला वाटेल की एसी मुळे तुम्हाला खूप पैसे लागतील, तोपर्यंत एसी बदलून घ्या.

पहिली चूक म्हणजे लोक एसी विकत घेतात, पण जर त्यांना योग्य वेळी एसी सर्व्हिसिंग न मिळाल्यास एसीला त्रास होऊ लागतो आणि अशा परिस्थितीत आग किंवा स्फोट होण्याचा धोका वाढतो. दुसरी चूक, वॉरंटी कालावधी संपल्यानंतर, लोक पैसे वाचवण्यासाठी कंपनीच्या ऐवजी त्यांच्या एसीमध्ये लोकल पार्ट्स बसवतात. अर्थात सुरुवातीला पैशांची बचत होते, पण लोकल पार्ट्समुळे एसीचे आयुष्य तर कमी होतेच पण स्फोटाचा धोकाही वाढतो.

# क्रेडिट कार्ड की बचतछ लहान खर्च भागवण्यासाठी सर्वोत्तम पर्याय कोणता

जेव्हा लहान-सहान खर्चाचा विचार केला जातो, म्हणजे अशी आर्थिक उद्दिष्टे जी कमी कालावधीत पूर्ण करायची असतात. म्हणून एखाद्या व्यक्तीकडे दोन पर्याय असतात: एकतर तो त्याचे क्रेडिट कार्ड वापरून काम पूर्ण करू शकतो किंवा तो त्याच्या बचत खात्यात पडलेले पैसे वापरू शकतो. या दोघांमध्ये कोणता सर्वोत्तम पर्याय आहे याबद्दल तुम्ही गोंधळात असाल, तर ही बातमी तुमच्यासाठी आहे. आज आम्ही तुम्हाला याबद्दल सविस्तरपणे सांगणार आहोत. प्रथम अल्पकालीन खर्चातर्गत कोणते खर्च येतात, ते समजून घेऊ. येथे आम्ही तुम्हाला काही उदाहरणे दिली आहेत. तर इतर काही खर्चाचाही त्यात समावेश आहे.

आपत्कालीन निधी तयार करणे

कुटुंबातील सर्व कमावत्या व्यक्तींसाठी मुदत जीवन विमा खरेदी करणे

कुटुंबातील सर्व सदस्यांसाठी आरोग्य विमा खरेदी करणे

मोबाईल, लॅपटॉप, टॅबलेट इत्यादी इलेक्ट्रॉनिक गॅझेट्स खरेदी करणे.

घराचे नूतनीकरण

दुचाकी किंवा चारचाकी वाहन खरेदी करणे

कुटुंबासह सुट्टीला बाहेर जाणे

अल्पकालीन आर्थिक उद्दिष्टांसाठी तुम्ही तुमचे क्रेडिट कार्ड वापरू शकता. उदाहरणार्थ, घरगुती कौटुंबिक सुट्टीचे उदाहरण घेऊ. तुम्ही तुमच्या क्रेडिट कार्डने प्रवासाची तिकिटे, हॉटेलची निवास व्यवस्था बुक करू शकता आणि तुमच्या सुट्टीसाठी जेवण आणि इतर खर्चाचे पैसे देऊ शकता. जेव्हा मासिक क्रेडिट कार्ड बिल तयार होते, तेव्हा तुम्ही थकबाकी क्रेडिट कार्ड बिल भरण्यासाठी सुट्टीच्या उद्दिष्टासाठी वाचवलेले पैसे वापरू शकता. यामुळे तुम्हाला थोडा वेळ मिळतो आणि दुसरा फायदा म्हणजे तुमच्या बचतीत काही कमतरता असेल, तर तुम्ही पुढील म हिन्याच्या तुमच्या पगारातून क्रेडिट कार्डचे बिल भरून ते भरून काढू शकता.

**क्रेडिट कार्ड वापरण्याचे फायदे**

विनामूल्य क्रेडिट कालावधी ५० दिवसांपर्यंत

सध्याच्या क्रेडिट कार्ड ऑफरवर त्वरित सूट

क्रेडिट कार्ड रिवॉर्ड पॉइंट्स

क्रेडिट कार्डवर माइलस्टोन आणि किंवा खर्चावर आधारित ऑफर. क्रेडिट कार्ड नवीनतम फी माफ करण्यासाठी वार्षिक खर्च

विमानतळ लाउंजमध्ये प्रवेश इत्यादी फायदे अनलॉक करण्यासाठी खर्च करा.

म्हणजेच, एकूणच, लहान खर्चासाठी क्रेडिट कार्ड हा सर्वोत्तम पर्याय ठरला आहे, कारण यामध्ये तुम्ही ऑफर्सचा लाभ घेऊ शकता आणि तुम्हाला बिल भरण्यासाठी ५० दिवसही मिळतात. लक्षात ठेवा की जर तुमच्याकडे बिले भरण्याची क्षमता नसेल, तर तुम्ही क्रेडिट कार्ड वापरणे टाळावे, कारण वेळेवर बिले न भरल्याने क्रेडिट स्कोअरवर परिणाम होतो.

# जपानमध्ये रिकाम्या घरांची समस्या



जपानमध्ये रिकामी घरे ही एक जटिल आणि राष्ट्रीय स्तरावरची समस्या बनली आहे. या समस्येला जपानी भाषेत 'अकिया' समस्या म्हणतात. घटती लोकसंख्या आणि जुनी घरे वारसांना सांभाळणे कठीण झाल्यामुळे जपानमध्ये रिकाम्या घरांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. २०२३ च्या सरकारी आकडेवारीनुसार जपानमध्ये ९ मिलियन म्हणजेच १३.८ टक्के घरे रिकामी होती. म्हणजेच दर आठ घरांपैकी एक घर रिकामे होते. नोमुरा रिसर्च इन्स्टिटयूटच्या अभ्यासानुसार, २०३३ पर्यंत जपानमधील रिकाम्या घरांची टक्केवारी ३०.४ टक्क्यांपर्यंत पोहचण्याची शक्यता आहे. म्हणजेच सरासरी, प्रत्येक घराशेजारी एक निर्जन घर असू शकते.

समस्येची कारणे-लोकसंख्येत घट आणि वृद्धांचे प्रमाण : जपानमध्ये जन्मदर कमी आहे, त्यामुळे वृद्धांचे प्रमाण वाढत आहे. घरमालकाचा मृत्यू झाल्यावर, त्यांचे वारसदार जे शहरांमध्ये स्थायिक झालेले आहेत ते घर विकत नाहीत किंवा त्यात राहायला जात नाहीत.

शहरांकडे स्थलांतर : तरुण लोक ग्रामीण भाग सोडून मोठ्या शहरांमध्ये (उदा. टोकियो, ओसाका) नोकरीसाठी जात आहेत. त्यामुळे ग्रामीण भागातील घरे ओस पडत आहेत.

कर नियम : जपानमध्ये रिकाम्या भूखंडावर मालमत्ता कर खूप जास्त असतो. याउलट, त्याच भूखंडावर जुने, जीर्ण झालेले घर उभे असल्यास कर सवलत मिळते. यामुळे घरमालक, जुने आणि धोकादायक असले तरी, ते घर पाडून भूखंड रिकामा करत नाहीत. नूतनीकरणाची किंमत : अनेक रिकामी घरे जुनी आणि जीर्ण झालेली असतात. त्यांची दुरुस्ती करणे खूप महागडे असते आणि अनेकदा ते नवीन घर बांधण्यापेक्षा जास्त खर्चिक ठरते.

नवीन घरांना प्राधान्य : जपानी संस्कृतीत, नवीन घरात राहण्याला प्राधान्य दिले जाते. जुनी घरे वापरण्याऐवजी, लोक नवीन घरे बांधणे किंवा खरेदी करणे पसंत करतात.

धोके कोणते? रिकामी घरे कचरा टाकण्याचे ठिकाण बनतात किंवा गुन्हेगारी कारवायांसाठी वापरली जाऊ शकतात.

जीर्ण घरे भूकंप किंवा वादळात कोसळू शकतात, ज्यामुळे शेजारच्या घरांना धोका निर्माण होतो. देखभाल नसल्यामुळे या घरांमध्ये कीटक वाढतात, त्याचा सार्वजनिक आरोग्यावर परिणाम होतो.या रिकाम्या घरांमुळे प्रशासनाला त्या परिसराचा विकास करणे, रस्ते मोठे करणे किंवा सार्वजनिक प्रकल्प राबवणे कठीण होते.

समस्येवर सरकारचे उपाय

अकिया बँक : स्थानिक नगरपालिका रिकाम्या घरांची यादी तयार करतात आणि ती कमी किमतीत खरेदीदारांना उपलब्ध करून देतात. अनेक ठिकाणी ही घरे विनामूल्य किंवा अगदी नाममात्र किमतीत उप-लब्ध आहेत.अनुदान : सरकार आणि स्थानिक प्रशासन या रिकाम्या घरांची खरेदी, नूतनीकरण आणि पाडण्यासाठी अनुदान देते.कर नियमांमध्ये बदल : सरकारने आता मालकी नसलेल्या किंवा धोकादायक अकिया घरांवर असलेली कर सवलत काढून टाकण्यास सुरुवात केली आहे, जेणेकरून मालक ती घरे पाडून भूखंड रिकामा करतील. विदेशी गुंतवणूक : काही क्षेत्रांमध्ये विदेशी नागरिकांना ही घरे खरेदी करण्यासाठी आणि त्यांचा उपयोग पर्यटन किंवा निवासस्थानासाठी करण्यासाठी प्रोत्साहन दिले

## या गोष्टी न केल्यास मुलांच्या विकासात होईल नुकसान



काही गोष्टी आणि त्यांच्या आठवणी, आणि आपले बालपण यांची सांगड कशी घट्ट असते ! मातीमध्ये खेळणे, आईची नजर चुकवून गावभर, मित्र-मैत्रिणींच्या संगतीत हिंडणे.. अश्या वेळी डोक्यावरच्या उन्हाची पर्वा न करता लपंडाव, डब्बा ऐसपैसचे रंगणारे डाव..याच्या आठवणी मनातून पुसल्या जात नाहीत. त्या काळी मुलांची रोगप्रतिकारशक्ती देखील कमालीची असे. पावसात भिजून किंवा थंडगार बर्फाचा गोळा खाऊन, मातीत खेळून मुले सहजासहजी आजारी पडत नसत. आता काळ बदलला, तशी मुलांना वाढविण्याच्या तऱ्हा देखील बदलल्या. मुलांनी निसर्गाच्या सान्निध्यात राहून मोठे व्हायला हवे असे म्हणणारे आधीचे आई बाबा, आता मुले थोडीशी कळती होता क्षणीच त्यांची मैत्री टीव्ही आणि व्हिडियो गेम्सशी करून देतात. जोडीला मोबाईल फोनही असतोच. पण अश्या वेळी मुलांनी काही गोष्टींचा आनंद घ्यायलाच हवा. त्या गोष्टींपासून त्यांना वंचित न ठेवता, त्या गोष्टी त्यांना मनसोक्त करू द्याव्यात.मुले आजारी पडतील का, याची फार काळजी न करता, पावसाच्या पाण्यामध्ये मुलांना मनसोक्त खेळू द्या. चिखलामध्ये हात घालू द्या, या गोष्टींचा आनंद काही वेगळाच असतो. पाळीव प्राण्यांशी खेळणे मुलांकरिता, त्यांच्या मनावरील ताण कमी करण्यासाठी अतिशय फायद्याचे आहे. मानसिक तणाव फक्त घरातील मोठ्यांनाच असतात असे नाही. लहान मुलांच्या मनावरही अनेक गोष्टींचे तणाव असतात. पाळीव प्राण्यांचा लळा असणे, त्यांच्या मनावरील तणाव कमी करणारे आहे. याचबरोबर प्राण्यांबद्दल लहान मुलांच्या मनामध्ये प्रेम निर्माण करण्याची जबाबदारी पालकांची असते.

लहान मुलांच्या मनामध्ये अनेक वेळा चित्र विचित्र गोष्टी पाहून कुतूहल निर्माण होते. त्यावेळी मुलांना त्या वस्तूंबद्दल सांगावे, त्या वस्तूंना स्पर्श करू द्यावा. जर त्यांनी पाहिलेली, स्पर्शिलेली वस्तू आणि तो अनुभव, त्यातून मिळालेला आनंद मुलांच्या कायम स्मरणात राहील. कधी तरी मुलांना घरामध्ये पसारा घालू द्यावा. त्यांच्या मनामध्ये येतील ती खेळणी त्यांना काढू द्यावी, त्यांच्याबरोबर पालकांनी देखील खेळामध्ये सहभागी व्हावे. एखाद्या कलेची किंवा खेळाची मुलांना आवड असेल, तर ती कला आत्मसात करण्यासाठी, किंवा तो खेळ खेळण्यासाठी मुलांना प्रोत्साहन द्यावे.

# सांस्कृतिक उद्योजकता : महाराष्ट्राच्या प्रगतीचा नवा पाया



**डॉ. गीताली टिळक ,कुलगुरू, टिळक महाराष्ट्र विद्यापीठ, पुणे**

महाराष्ट्राने ज्ञान, कला आणि सांस्कृतिक परंपरा यांचा समन्वय साधत देशाच्या सामाजिक-आर्थिक विकासात दीर्घकाळ महत्त्वपूर्ण यो-गदान दिले आहे; पण नव्या जागतिक परिस्थितीत, विशेषतः कृत्रिम बुद्धिमत्ता, डिजिटल प्रसारमाध्यमे आणि सांस्कृतिक उद्योगांच्या वेगवान वाढीच्या पार्श्वभूमीवर, आपल्या संस्कृतीची नवीन मांडणी आणि तिच्या प्रणालीगत विकासाची गरज प्रकर्षाने जाणवते. या संदर्भात सांस्कृतिक उद्योजकता ही संकल्पना केवळ आर्थिक संधी निर्माण करणारी नव्हे, तर समाजाला नव्या ओळ-खीची, नव्या ऊर्जेची प्रेरणा देणारी ठरू शकते.आजचा तरुण वर्ग पारंपरिक नोकरीपलीकडे जाणार्या करिअरचा शोध घेत आहे. कला, लोकपरंपरा, नाट्य, संगीत, साहित्य, हस्तकला, लोकसाहित्य आणि पर्यटन या क्षेत्रांत महाराष्ट्राला अद्वितीय वारसा लाभला आहे; परंतु या वारशाचे उत्पादन, व्यवस्थापन आणि बाजारपेठीकरण यांची आधुनिक पूरक रचना तयार केल्याशिवाय, या क्षेत्रातील तरुणांना जागतिक स्तरावरची उंची मिळणे अवघड आहे. त्यामुळे सांस्कृतिक घटकांना उद्योजकतेशी जोडणारी नवी शैक्षणिक रचना ही काळाची मागणी बनली आहे.

विद्यापीठांनी 'सांस्कृतिक उद्योजकता' ही स्वतंत्र अभ्यासशाखा म्हणून स्थापावी, अशी अपेक्षा आता वाढू लागली आहे. यात विद्यार्थी केवळ परंपरा शिकणार नाही, तर त्या परंपरा आधुनिक भाषेत कशा सादर करायच्या, डिजिटल माध्यमांतून त्यांची मूल्यसाखळी कशी उभारायची, स्टार्टअप मॉडेल कसे विकसित करायचे, पर्यटनाशी कसा मेळ साधायचा, स्थानिक समुदायांना कशा प्रकारे रोजगार निर्मितीत सहभागी करायचे याचे सक्षम प्रशिक्षण मिळणे आवश्यक आहे.महाराष्ट्रातील काही नामांकित संस्थांनी लोककला, वारसा व्यवस्थापन, क्राफ्ट-डिझाइन, डिजिटल आर्टस् आणि मीडिया प्रॉडक्शनच्या माध्यमातून या दिशेने महत्त्वाची पावले उचलली आहेत; परंतु राज्यभर एकसंध धोरण, वित्तीय प्रोत्साहन, संस्थात्मक सहकार्य आणि ग्रामीण-शहरी जोडणीचा बळकट पूल उभारणे आता अत्यावश्यक बनले आहे.सांस्कृतिक उद्योजकतेचे खरे सामर्थ्य हे केवळ रोजगार निर्मितीत नसून सांस्कृतिक स्वाभिमानाच्या पुनर्निर्मितीत आहे. जागतिकीकरणामुळे विविध परंपरांचे मिश्रण झाले असले तरीही स्थानिक ओळख एका प्रदेशाला त्याची वैशिष्ट्यपूर्ण उंची देते. महाराष्ट्राच्या लोकपरंपरेत नव्या पिढीसाठी प्रेरणा दडलेली आहे. लावणीचे सौंदर्य, पोवाड्याची ऊर्जा, वर्धा-कोल्हापूर-सातारा या पट्ट्यातील हस्तकलेचे कौशल्य, वारकरी परंपरेतील एकात्मतेचा संदेश, पुणे-मुंबईतील नाट्य-सांस्कृतिक चळवळींची प्रगल्भता या सर्व गोष्टींचे ज्ञानव्यवस्थेत रूपांतर म्हणजे सांस्कृतिक उद्योजकतेचे उद्युक्त करणारे बीज आहे.आज महाराष्ट्राला तंत्रज्ञानाचे दालन जसे खुलते आहे, तसेच कलेचे उद्योगीकरण आणि वारशाचे आधुनिकीकरण करणारा ठोस विकासमार्ग तयार झाला पाहिजे. विद्यापीठे, उद्योग, स्थानिक समुदाय, प्रवासी मराठी, कलावंत आणि तज्ज्ञ यांच्या संयुक्त नेतृत्वातून हे शक्य आहे. म्हणूनच, महाराष्ट्राच्या सर्वांगीण प्रगतीसाठी सांस्कृतिक उद्योजकता हे फक्त एक शैक्षणिक क्षेत्र नाही, तर राज्याच्या सामाजिक आत्मविश्वासाचा, आर्थिक सक्षमीकरणाचा आणि सांस्कृतिक ओळखीचा आधारस्तंभ

## वैवाहिक जीवनासाठी काही टिप्स

### डॉक्टर टीप्स



वैवाहिक जीवनासाठी योग्य नाही आहे या गोष्टी - खास करून महिला, आपल्या पार्टनरसोबत सहवासाबद्दल बोलताना टाळण्याचा प्रयत्न करतात. कारण त्या यात स्वत:ला असहज जाणवतात किंवा त्यांना असे वाटत की सहवासाबद्दल बोलण्याची काहीच गरज नसते. पण हिच सर्वात मोठी चूक आहे जी तुमची सेक्स लाईफ बरबाद करू शकते. तर पाहूया त्या ७ गोष्टींकडे ज्या तुमच्या सहवास लाईफसाठी योग्य नाही आहे.

**१. फोरप्ले न करणे** - भले तुमचे पूर्ण लक्ष आणि अॅनर्जी ऑर्गेजमवर असेल, पण फोरप्लेला एवढेच महत्त्व द्यायला पाहिजे. एक दूसर्यासोबत मसाज सेशनमध्ये काही वेळ घालवू शकता.

## विनोद

**घोटाळे, गैरव्यवहार बंद झाले तर एवढा खर्च करून निवडणूक कोण लढणार!**




शिक्षक : सांग बंडू, चहा लाभदायक की नुकसानकारक?
बंडू : कुणी पाजला तर लाभदायक, पाजावा लागला तर नुकसानकारक.

## संदेश

**Banta:** Name the 3 fastest means of communication.
**Santa:** Telephone, Television, Tell-a-woman

## सुविचार




**त्याग करावा पण ताठा नसावा.**

**संस्कृत सुभाषित**

युक्तियुक्तं प्रगृह्णीयत बालादपि विचक्षण:।
खेरविषयं वस्तु किं न दीप: प्रकाशयेत्?।।

**अर्थ :** एखादी योग्य गोष्ट लहान मुलाने जरी सुचविली ती तिपुणानेही ग्रह्य धरावी. जिथे सूर्यप्रकाश पोचत नाही, (ती जागा) दिव्याने प्रकाशित होत नाही का?

# मनोरंजक महाशब्दकोडे



### आडवे शब्द

१. कलागत लावणारा
३. हवाई प्रवाशांचा थांबा
५. पशु, श्वपद
८. सुप्रसिद्ध
९. आवश्यक गणसंख्या
१०. झाकण्याचे पात्र
११. सद्वर्तनी
१३. हेतुपुरस्पर वेळ वाया घालविणे
१५. कडकडीत, गरम
१६. रसाळ, गोमटी फळे देणारा मसंयमफ
१७. युद्ध
१९. भूपती
२०. अंदमानलगतचे बेट
२२. अनुयायी, सेवक
२३. कर्ण
२५. एकमेकापुढे
२७. पाप
२९. चकाकी
३१. अती उंचीचे विशेषण
३२. शंकर
३३. कांद्याचे हिरवे पान
३४. शेंगेची साल
३६. चुलता
३७. आजूबाजूला, निकट
३९. एक सुगंधी उष्ण पेय
४०. कायदेशीर
४१. पसरट, उथळ वाटी
४२. चांगली
४३. अंकुर
४४. सवड
४७. कैद
४८. चाळा, छंद
४९. उणीव, बनावटपणा
५०. व्यसनी
५१. ठसा उमटविणे, एकसारख्या प्रती काढणे
५२. युक्ती
५३. पवित्र
५४. विरड्यांची डाळ
५५. अदृश्य
५६. खून, हत्या
५८. दंड व बाहू यांना जोडणारा सांधा
६०. सतत
६२. दुसऱ्याचे उपकार
६४. मनुष्य
६५. आईचा भाऊ
६७. पांढरे सुगंधी फूल
६८. कौसल्यापुत्र
६९. दृष्टीभेट
७०. अहंकार
७१. ताणल्यास तुटणारे

### उभे शब्द

१. छोटी घागर
२. अभ्यासपूर्ण भाषण
३. उगीच, नाहक
४. प्रकरण, घटना, बाब
५. सोन्याचांदीचा धागा
६. बारसे
७. किरकिर करणारा
१२. भूमीतील तीन कोनांची नावे
१४. दुसऱ्यासाठी केलेला खर्च
१८. सुसर
२०. निर्णय
२१. मदत न करणे
२४. स्वैर, नियमबाह्य
२५. संतोष
२६ मयूर
२७. सरसरीत
२८. अंदाज, अनुमान
३०. पोपट
३३. एक चर्तुथांश
३५. भेग, चीर
३६. तांबडा भोपळा
३७. लोकांचा घोळका
३८. पाण्याला करून दिलेली वाट
३९. न वापरलेला, नवा
४०. टपोरी, मवाली
४३. सांगड (ला.)
४४. गुन्हा
४५. सदोदित
४६. खर्चातील कपात
४७. महासर्प
४८. वाळवलेल हरभरा
४९. सुगरणीचे घरटे, केशरचनेचा पेशवेकालीन प्रकार
५०. नूतन
५२. नगण्य किंमत
५७. परका
५९. वारा
६१. संमती, होकार
६२. रज:कण
६३. इच्छा
६४. फक्त, केवळ
६५. भडीमार
६६. प्रतिष्ठा, अब्रू

### आडवे उत्तर

१.कळलाव्या ३.विमानतळ ५.जनावर ८.ख्यातनाम ९.कोरम १०.डबा ११.शील-वान १३.कालपव्यय १५.कढत १६.धीर १७.समर १९.राजा २०.निकोबार २२.गण २३.कान २५.समोरासमोर २७.पातक २९.लकाकी ३१.ताडमाड ३२.हर ३३.पात ३४.टरफल ३६.काका ३७.जवळपास ३९.कोको ४०.सनद-शीर ४१.रानटी ४३.मोड ४४.अवसर ४७.अटक ४८.चळ ४९.खोट ५०.नशाबाज ५१.छापणे ५२.करामत ५३.पाक ५४.वाल ५५.गडप ५६.वध ५८.कोपर ६०.हरघडी ६२.परोपकार ६४.मानव ६५.मामा ६७.मोगरा ६८.राम ६९.नजरानजर ७०.गर्व ७१.नाते

### उभे उत्तर

१.कळशी २.व्याख्यान ३.विनाकारण ४.मामला ५.जर ६.नामकरण ७.रडतराऊत १२.लघुकोन काटकोन विशालकोन १४.पदरमोड १८.मगर २०.निकाल २१.असहकार २४.बेताल २५.समाधान २६.मोर २७.पातळसर २८.कयास ३०.कीर ३३.पाव ३५.फट ३६.काशी यात्रा ३७.जमाव ३८.पाट ३९.कोरा ४०.सडकछाप ४३.मोट ४४.अपराध ४५.सतत ४६.काटकसर ४७.अजगर ४८.चणे ४९.खोपा ५०.नवा ५२.कवडीमोल ५७.उपरा ५९.पवन ६१.रकार ६२.पराग ६३.कामना ६४.मत्र ६५.मारा ६६.मान



# क्रीडा विश्व

## थोडक्यात/ संक्षिप्त

### नितीश रेड्डीचे काय करायचे? अख्ख्या सामन्यात १० धावा आणि ० विकेट्स

मुंबई -दक्षिण आफ्रिकेने गुवाहाटी टेस्ट जिंकत भारतात तब्बल २५ वर्षानंतर मालिका जिंकण्याचा पराक्रम केला. दक्षिण आफ्रिकेच्या विजयात त्यांच्या ऑलराऊंडर्सचं योगदान मोलाचं ठरलं. दक्षिण आफ्रिकेसाठी ऑलराऊंडर्स निर्णायक ठरत असताना भारतासाठी मात्र ऑलराऊंडर खेळाडू सपशेल निराशाच ठरला. भारतीय संघाने गुवाहाटी कसोटीत अक्षर पटेलऐवजी नितीश कुमार रेड्डीला खेळवण्याचा निर्णय घेतला. तो ऑलराऊंडर म्हणून बॅटिंग आणि बॉलिंगमध्ये योगदान देईल अशी अपेक्षा होती. मात्र तसं काहीही झालं नाही.
नितीशला बॅटिंग आणि बॉलिंगमध्ये दोन्हीमध्ये योगदान देता आलं नाही. बॉलिंगच्या बाबतीत भारताचा कर्णधार ऋषभ पंतचा त्याच्या गोलंदाजीवर विश्वास नसल्याचं स्पष्ट झालं. पहिल्या डावात नितीशने ६ षटकं टाकली. बाकी गोलंदाजांनी २५ पेक्षा जास्त षटकं टाकली.फलंदाजी करताना मार्को यान्सनच्या उसळत्या चेंडूवर १० धावा करून नितीश बाद झाला. आफ्रिकेच्या दुसऱ्या डावातही गोलंदाज नितीश दिसलाच नाही. ७८ पैकी त्याला अवघी ४ षटकं टाकायला मिळाली. दुसऱ्या डावात कसोटी वाचवण्यासाठी मोठी खेळी करणं अपेक्षित होतं.

### दोष सर्वांचा, पण सुरुवात माझ्यापासून; मी पराभवाची जबाबदारी स्वीकारतो

मुंबई -भारतविरुद्धच्या दोन सामन्यांची कसोटी मालिका दक्षिण अफ्रिकेने २-० अशा फरकाने जिंकली आहे. दुसऱ्या कसोटी सामन्यात दक्षिण आफ्रिकेनं भारताला ४०८ धावांनी पराभूत केलं. ५४९ धावांचं आव्हान गाठताना भारत १४० धावांतच गारद झाला. धावांचा विचार करता भारताचा आजवरचा सर्वात मोठा पराभव आहे. तसेच दक्षिण आफ्रिकेनं तब्बल २५ वर्षानंतर भारतात कसोटी मालिका जिंकली.
भारताला मायदेशातच सलग दुसऱ्यांदा कसोटी क्रिकेटमध्ये व्हाईटवॉशला सामोरं जायला लागलं. न्यूझीलंडनं ३-० ने पराभूत केल्यानंतर आता दक्षिण आफ्रिकेनेही २-० ने हरवलं. दुसऱ्या गुवाहाटी कसोटीत भारताचा लाजिरवाणा पराभव झाला. भारताच्या या पराभवानंतर मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर वर टीका होण्यास सुरुवात झाली आहे. गौतम गंभीरने भारताच्या मुख्य प्रशिक्षकाची जबाबदारी घेतल्यानंतर रेकॉर्ड चांगला राहिलेला नाही. त्यामुळे सोशल मीडियावर आता गौतम गंभीरने मुख्य प्रशिक्षकपदाचा राजीनामा द्यावा, अशी मागणी करण्यात येत आहे. सामना संपल्यानंतर आता गौतम गंभीरने राजीनाम्यावर भाष्य केलं आहे.

### आता पाकिस्तानही टीम इंडियाच्या पुढे, डब्ल्युटीसी पॉइंट्स टेबलमध्ये उलथापालथ

मुंबई -टेम्बा बावुमाच्या नेतृत्वाखालील वर्ल्ड टेस्ट चॅम्पियन दक्षिण आफ्रिकेने भारतात येऊन इतिहास रचला आहे. तब्बल २५ वर्षापासून भारतात कसोटी मालिका जिंकण्याची प्रतीक्षा करणाऱ्या दक्षिण आफ्रिकेला अखेर गुवाहाटीतील दुसऱ्या कसोटीत मोठा विजय मिळाला. सामन्याच्या शेवटच्या दिवशी दक्षिण आफ्रिकेने टीम इंडियाचा केवळ १४० धावांत आटोपला आणि ४०८ धावांनी विक्रमी विजय नोंदवला. यासह दोन सामन्यांची मालिका २-० ने जिंकत त्यांनी भारतात क्लीन स्वीप केला. हा कसोटी क्रिकेटमधला भारताचा सर्वात मोठा धावांनी झालेली पराभव आहे. तसेच २००० नंतर प्रथमच दक्षिण आफ्रिकेने भारतात कसोटी मालिका जिंकली आहे.भारतातील पराभवामुळे ऊण पॉइंट्स टेबलमध्ये पाकिस्तानला मोठा फायदा झाला. दुसरी कसोटी हरल्यानंतर भारताची पॉइंट्स टक्केवारी ४८.१४ वर घसरली आहे, ज्यामुळे पाकिस्तान चौथ्या स्थानावर पोहोचली आहे. याआधी पाकिस्तान पाचव्या स्थानावर होता. भारतीय संघ आता पाचव्या स्थानावर घसरला आहे. गुवाहाटी कसोटी जिंकल्यानंतर दक्षिण आफ्रिकेची विजय टक्केवारी ७५ झाला असून तो दुसऱ्या स्थानावर आहेत. ऑस्ट्रेलिया ४ पैकी ४ सामने जिंकून अद्याप अव्वल स्थानावर कायम आहे.

### भारताच्या पराभवाने चाहते दुःखात बुडाले

मुंबई-आयसीसी २०२६ टी२० वर्ल्ड कप स्पर्धेच्या वेळापत्रकाची आणि ठिकाणांची मंगळवारी २६ नोव्हेंबर २०२५ ला घोषणा करण्यात आली होती. या घोषणेसह रोहित शर्माला या टी२० वर्ल्ड कपचा ब्रँड अँम्बेसेडर देखील बनवण्यात आलं होतं.त्यामुळे फॅन्स प्रचंड खुश होते. पण आज गुवाहाटीच्या मैदानावर भारताच्या पराभवाने फॅन्सची निराशा झाली होती. पण रोहित शर्माने पुन्हा एकदा फॅन्सना एक गूडन्यूज दिली आहे. त्यामुळे चाहत्यांच्या चेहऱ्यावर पुन्हा हसू उमललं आहे.त्यामुळे रोहित शर्माने नेमकं काय केलं आहे? हे जाणून घेऊयात.खरं तर गुवाहाटीच्या बारसपारा स्टेडिअमवर दुसऱ्या टेस्ट सामन्यात साऊथ आफ्रिकाने ४०८ धावांनी भारताचा पराभव केला. या विजयासह साऊथ आफ्रिकने २-०ने ही टेस्ट मालिका जिंकली आहे.
विशेष म्हणजे भारताच्या भूमिवर मागच्या २५ वर्षातला दक्षिण आफ्रिकेचा पहिला टेस्ट मालिका विजय होता. या विजयाने भारतीय फॅन्सची मोठी निराशा झाली होती. या निराशेत रोहित शर्मा गूडन्यूज घेऊन आला होता.

## दक्षिण आफ्रिकेडून भारत संघाचा कसोटीत लाजिरवाना पराभव

गुवाहाटी २६ नोव्हेंबर (पीएसआय) भारत आणि दक्षिण आफ्रिका क्रिकेट संघातील दुसरा कसोटी सामना गुवाहाटी इथं संपला. संपूर्ण सामन्यात दक्षिण आफ्रिकेच्या संघाचं वर्चस्व राहिलं. भारतासमोर या सामन्यात ५४९ धावांचं महाकाय लक्ष्य होतं आणि त्याचा पाठलाग करणं अत्यंत कठीण होतं. चाहत्यांना आशा होती की टीम इंडिया शेवटच्या दिवशी फलंदाजी करण्यात यशस्वी होईल आणि सामना अनिर्णित राहील. मात्र, भारतीय संघ फक्त ६३.५ षटकांतच सर्वबाद झाला आणि दक्षिण आफ्रिकेनं ४०८ धावांनी सामना जिंकला. त्यांनी टीम इंडियाला २-० असा धुव्वा उडवत मालिका जिंकली. विशेष म्हणजे टीम इंडियाच्या ९३ वर्षाच्या कसोटी क्रिकेटच्या इतिहासात हा धावांच्या बाबतीत सर्वात मोठा पराभव आहे.
सायमन हार्मरच्या ९ विकेट : सामन्यात प्रथम फलंदाजी करताना पाहुण्या संघानं पहिल्या डावात ४८९ धावा केल्या आणि दुसऱ्या डावात २६०५ धावांवर डाव घोषित केला. त्यानंतर भारतासमोर ५४९ धावांचं मोठं लक्ष्य होतं. भारतीय संघ दबावाखाली कोसळला, पहिल्या डावात फक्त २०१ धावा आणि दुसऱ्या डावात १४० धावाच करु शकला. आफ्रिकन गोलंदाजांनी दोन्ही डावात भारतीय फलंदाजांना स्थिरावू दिलं नाही. दुसऱ्या डावात दक्षिण आफ्रिकेकडून सायमन हार्मरनं ६ बळी घेतले आणि सामन्यात त्याच्या बळींची संख्या ९ झाली. त्याच्याशिवाय वेगवान गोलंदाज मार्को जान्सननंही पहिल्या डावात सहा बळी घेतले, तर दुसऱ्या डावात त्यानं फक्त एक बळी घेतला. मार्को जान्सन पहिल्या डावात फलंदाजी करताना ९३ धावांची शानदार खेळी केली होती.दक्षिण आफ्रिकेच्या पहिल्या डावात ४८९ धावा : या कसोटी सामन्याबद्दल, दक्षिण आफ्रिकेने नाणेफेक



**आफ्रिकन संघाचा १०वा कसोटी मालिका विजय**
**आतापर्यंत भारत आणि दक्षिण आफ्रिकेमध्ये १६ कसोटी मालिका खेळल्या गेल्या आहेत. दक्षिण आफ्रिकेनं यापैकी नऊ जिंकल्या होत्या, तर भारतानं चार जिंकल्या आहेत, ज्यामध्ये चार मालिका अनिर्णित राहिल्या आहेत. सध्याची मालिका १७वी होती आणि ही मालिका जिंकून, आफ्रिकन संघानं भारताविरुद्धची १०वी कसोटी मालिका जिंकण्याच्या पराक्रम केला आहे.**

जिंकून प्रथम फलंदाजी करण्याचा निर्णय घेतला. प्रथम फलंदाजी करताना आफ्रिकन संघाने ४८९ धावा केल्या. संघाकडून सेनुरन मथुसामीने १०९ धावांची शानदार खेळी केली. प्रत्युत्तरादाखल, संघ पहिल्या डावात २०१ धावांवर ऑलआउट झाला. त्यानंतर आफ्रिकन संघाने आपला दुसरा डाव २६० धावांवर घोषित केला आणि भारतासमोर ५४९ धावांचे लक्ष्य ठेवले. प्रत्युत्तरात, भारताचा दुसरा डाव १४० धावांवर संपला आणि ४०८ धावांनी सामना गमावला.टीम इंडियाचा लाजिरवाणा पराभव : या सामन्यात टीम इंडियाला कसोटी इतिहासातील सर्वात मोठा पराभव पत्करावा लागला. भारतीय संघाचा ४०८ धावांनी पराभव होण्याची ही पहिलीच वेळ होती. भारताचा याआधीचा सर्वात मोठा पराभव २००४ मध्ये नागपूरमध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध ३४२ धावांनी झाला होता. गौतम गंभीर मुख्य प्रशिक्षक झाल्यापासून, न्यूझीलंड आणि दक्षिण आफ्रिकेनं टीम इंडियाला एकतर्फी पराभूत केलं आहे.
२५ वर्षानंतर इतिहासाची पुनरावृत्ती : या सामन्यात विजय मिळवत टेम्बा बावुमाच्या नेतृत्वाखालील दक्षिण आफ्रिकेच्या संघानं एक अनोखा पराक्रम केला. दक्षिण आफ्रिकेनं यापूर्वी फक्त एकदाच भारतात कसोटी मालिका जिंकली होती. हा पराक्रम २५ वर्षापूर्वी २००० मध्ये हॅन्सी क्रोनिएच्या नेतृत्वाखाली घडला होता. त्यावेळी आफ्रिकन संघानं दोन सामन्यांच्या मालिकेत भारताचा २-० असा पराभव केला होता. आता, बावुमानं इतिहासाची पुनरावृत्ती करत दुसरी कसोटी जिंकली आणि मालिकाही जिंकली यासह तो क्रोन्येनंतर भारतात कसोटी मालिका जिंकणारा दुसरा दक्षिण आफ्रिकेचा कर्णधार बनला आहे.

## रोहित शर्मा पुन्हा एकदा अव्वल स्थानावर विराजमान

दुबई : आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेने बुधवारी (२६ नोव्हेंबर) पुरुषांची फलंदाजी क्रमवारी जाहीर केली आहे. या यादीत रोहित शर्माने पुन्हा एकदा अव्वल स्थानी झेप घेतली आहे. तर डॅरिल मिशेलची या यादीत दुसऱ्या स्थानी घसरण झाली आहे. ऑस्ट्रेलियाविरूद्ध झालेल्या तिसऱ्या वनडे सामन्यात रोहित शर्माने दमदार शतकी खेळी केली होती. या खेळीच्या बळावर त्याने अव्वल स्थानी झेप घेतली होती. पण त्यानंतर डॅरिल मिशेलने पुन्हा एकदा अव्वल स्थानी कब्जा केला होता. ऑस्ट्रेलियाविरूद्धच्या वनडे मालिकेनंतर भारतीय संघ एकही वनडे सामने खेळण्यासाठी मैदानात उतरलेला नाही. तरीदेखील रोहित पुन्हा एकदा नंबर १ फलंदाज बनला आहे. डॅरिल मिशेलने वेस्ट इंडिजविरूद्ध झालेल्या वनडे मालिकेत दमदार शतकी खेळी केली होती. या खेळीनंतर त्याने वनडे फलंदाजांच्या यादीत अव्वल स्थान मिळवलं होतं. त्याने ७६६ रेटिंग पॉईंट्सची कमाई केली आहे. तर अव्वल स्थानी असलेल्या रोहित शर्माने ७८१ रेटिंग पॉईंट्सची कमाई केली आहे. टी-२० आंतरराष्ट्रीय क्रिकेटमध्ये अष्टपैलू खेळाडूंच्या यादीत झिम्बाब्वेचा अनुभवी खेळाडू सिकंदर रझा अव्वल स्थ-ानी पोहोचला आहे. सिकंदर रझाने आतापर्यंत २८९ रेटिंग पॉईंट्सची कमाई केली आहे. झिम्बाब्वेचा संघ नुकताच पाकिस्तान आणि श्रीलंकेविरूद्ध



तिरंगी मालिका खेळण्यासाठी मैदानात उतरला होता. या मालिकेत सिकंदर रझाचा बोलबाला पाहायला मिळाला. त्याने पाकिस्तानविरूद्ध झालेल्या सामन्यात फलंदाजी करताना २३ धावा आणि गोलंदाजी करताना २ गडी बाद केले होते. तर श्रीलंकेविरूद्ध झालेल्या सामन्यात त्याने ३७ धावा करून ४ गडी बाद केले होते. तर पाकिस्तानचा सईय अयुब या यादीत दुसऱ्या स्थानी पोहोचला आहे. सईम अयुबने २६९ रेटिंग पॉईंट्ससह दुसरे स्थान गाठले आहे. कसोटी फलंदाजांच्या यादीत ट्रॅव्हिस हेड सहाव्या स्थानी पोहोचला आहे. हेडने इंग्लंडविरूद्ध झालेल्या ॲशेस मालिकेतील पहिल्याच कसोटीत दमदार शतकी खेळी केली होती. तर इंग्लंडचा स्टार फलंदाज २४ व्या स्थ-ानी जाऊन पोहोचला आहे. इंग्लंडचा अनुभवी फलंदाज जो रूट या यादीत अव्वल स्थानी आहे. जो रूटची रेटिंग ८८४ इतकी आहे. तर हॅरी ब्रूक ८५३ रेटिंग पॉईंट्ससह दुसऱ्या स्थानी आहे. तर केन विलियम्सन या यादीत तिसऱ्या स्थानी आहे. कसोटी क्रिकेटमधील टॉप १० फलंदाजांच्या यादीत यशस्वी जयस्वाल हा एकमेव भारतीय फलंदाज आहे. यशस्वी जयस्वाल ८ व्या क्रमांकावर

## हिटरमॅन रोहित शर्मा टी-२० विश्वचषकाचा ब्रँड ॲम्बेसेडर

दुबई : भारताच्या माजी कर्णधार आणि दोन वेळा टी-२० विश्वचषक विजेता रोहित शर्मा याची आगामी टी-२० विश्वचषक २०२६ साठी ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. भारत आणि श्रीलंका येथे ७ फेब्रुवारीपासून ८ मार्चपर्यंत होणाऱ्या या स्पर्धेत रोहित या नव्या भूमिकेतून सहभागी होणार आहेत. रोहितने २०२४-मध्ये भारतीय संघाचे नेतृत्व करत त्यांना टी-२० विश्वचषक जिंकवला होता. याआधी २००७ मध्येही तो विजयी संघाचा भाग होता. त्यामुळे दोन वेळा विश्वविजेता संघाचा अनुभव असलेल्या मोजक्या खेळाडूंपैकी तो एक आहे. टी-२० आंतरराष्ट्रीय सामन्यांत रोहितने तब्बल ४२३१ धावा केल्या आणि त्याची स्ट्राईक रेट १४०.८९ आहे. त्याच्या आक्रमक सुरुवातीमुळे भारतीय संघाला अनेक विजय मिळाले आ-हेत. २००७ च्या स्पर्धेत दक्षिण आफ्रिका व पाकिस्तानविरुद्ध त्याच्या नाबाद भूमिका चर्चेत आल्या. त्यानंतर २०२४मध्ये ऑस्ट्रेलियाविरुद्ध ४१ चेंडूंत ९२ धावा आणि इंग्लंडविरुद्ध ३९ चेंडूंत ५७ धावा करून तो चमकला.



विश्वविजयानंतर रोहितने टी-२० क्रिकेटपासून निवृत्ती घेतली होती. परंतु आता ॲम्बेसेडर म्हणून जागा घेत असून तो या स्पर्धेशी नव्या भूमिकेत उभा राहणार आहे. या नियुक्तीबाबत बोलताना रोहित म्हणाला की, हा विश्वचषक पुन्हा भारतात होतोय याचा आनंद मोठा आहे. नव्या भूमिकेत मन लावून सहभागी होणार असून सर्व खेळाडूंना शुभेच्छा देतो. भारताच्या आदरातिथ्याचा अनुभव खेळाडूंना मिळो आणि त्यांच्याकडे संस्मरणीय अभिज्ञता घेऊन जातील अशी आशा आहे.



**कतारमधील दोहा येथे फिफा अंडर-१७ विश्वचषक फुटबॉल सामन्यात भाग घेताना पोर्तुगाल आणि ब्राझीलमधील खेळाडू.**

## दक्षिण आफ्रिकेचे कोच शुकरी कोनराडच्या वक्तव्याने पेटला वाद

मुंबई-दक्षिण आफ्रिकेने भारताविरुद्ध चालू कसोटी मालिकेत दाखवलेली आक्रमकता जशी चर्चेत आहे, तितकाच वाद आता त्यांच्या कोच शुकरी कोनराड यांच्या एका वक्तव्यामुळे पेटला आहे. गुवाहाटी कसोटीच्या चौथ्या दिवसानंतर त्यांनी केलेली एक टिप्पणी भारतीय क्रिकेटप्रेमींना, माजी खेळाडूंना आणि तज्ज्ञांना एका क्षणात चीड आणणारी ठरली. भारताला थकवण्याच्या उद्देशाने पारी उशिरा घोषित केल्याचे सांगताना त्यांनी विरोधी संघाला कमी लेख-णारे आणि ऐतिहासिकदृष्ट्या संवेदनशील मानले जाणारे शब्द वापरले. आणि तिथूनच मोठा वाद सुरू झाला.
नेमकं काय म्हणाले कोनराड? दक्षिण आफ्रिकेने दुसऱ्या डावात २६०५ वर पारी घोषित करून भारतासमोर ५४९ धावांचा डोंगरासारखा टार्गेट ठेवला होता . खेळ संपल्यानंतर पत्रकार परिषदेत विचारलं गेलं की, एवढं लेट डिक्लेरेशन का? त्यावर कोनराड हसत म्हणाले, ''आम्ही भारताला मैदानावर जितकं जास्त वेळ उभं ठेऊ शकतो तितकं ठेवायचं ठरवलं होतं. आम्हाला पाहायचं होतं की ते 'ग्रोवेल' होतात का.'' 'ग्रोवेल' शब्दाचा थेट अर्थ यातील 'ग्रोवेल' या शब्द-ाचा थेट अर्थ 'जमिनीवर चेहरा घालून झुकणे, गुडघे टेकायला भाग पाडणे किंवा एखाद्याप-



ुढे पूर्णतः शरण जाणे. हा शब्द क्रिकेट इतिहासातील एका अत्यंत संवेदनशील वादाशी जोडला जातो. त्यामुळेच चाहते, तज्ज्ञ आणि माजी खेळाडू अधिक चिडले.१९७६ चा विवाद पुन्हा जागा ४९ वर्षापूर्वी इंग्लंडचे कर्णधार टोनी ग्रेग यांनी वेस्ट इंडिजविरुद्ध हाच शब्द वापरला होता. यामुळे इंग्रजी-कॅरेबियन क्रिकेट इतिहासातील अत्यंत गरम वातावरण तयार झाले होते कारण तो काळ रंगभेदाचा, गुलामगिरीच्या इतिहासाचा आणि राजकीय तणावाचा होता. त्याच शब्दाचा वापर कोनराड यांनी पुन्हा केल्याने क्रिकेट जगतात जुन्या जखमा पुन्हा कुरवाळल्या गेल्याची भावना निर्माण झाली आहे. अनिल कुबळेंनी स्पष्ट फटकार भारतीय क्रिकेटचा शालीन चेहरा म्हणून ओळखले जाणारे अनिल कुंबळे कोनराडच्या शब्दांवर फारच नाराज दिसले. स्टार स्पोर्ट्सवर बोलताना त्यांनी म्हटल, ''क्रिकेटमध्ये हे शब्द इतिहासाने भारलेले आहेत. अशा वेळी विजयाची नशा डोक्यावर जाऊ देऊ नये. टॉपवर असताना शब्दांचा संयम ठेवणं आणि विनम्र राहणं सर्वात महत्त्वाचं आहे.'' कुंबळे यांनी भर दिला की सामना जिंकणं आणि विरोधी संघाचा अपमान करणं यात मोठा फरक आहे. डेल स्टेनचाही उघड विरोध दक्षिण आफ्रिकेचेच दिग्गज वेगवान गोलंदाज डेल स्टेन यांनीही आपल्या देशाच्या कोचला सपोर्ट न करता कोनराडवरच टीकेचा बाण सोडला. स्टेनचं स्पष्ट मत की, ''मी या शब्दाच्या वापराचं समर्थन करूच शकत नाही. हे निराशाजनक आहे. शब्द हलक्फ ुलके असतील, कठोर असतील, यामुळे फरक पडत नाही. अशा भाषेचा क्रिकेटमध्ये काहीही स्थान नाही.'' त्यांच्या या प्रतिक्रियेमुळे वाद आणखी वाढला आहे.सोशल मीडियावर तुफान राग कोनराड यांच्या विधानानंतर ''ग्रोवेल'' हा शब्द, इंस्टाग्राम, यूट्यूबसह सर्व सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर ट्रेंडिंगला लागला. भारतीय चाहत्यांनी त्यांच्यावर ''ओव्हर कॉन्फिडन्स'', ''अनादर'', ''अहंकार'' अशा शब्दांत टीका केली आहे. काहींनी तर थेट कोनराड यांच्या जाहीर माफीची मागणी सुरू केली आहे.गुवाहाटीत खेळल्या गेलेल्या दुसऱ्या कसोटी सामन्यात भारताचा ४०८ धावांनी पराभव झाला, आणि पाहुण्या संघाने २-० ने क्लीन स्वीप करत मालिका जिंकली.

## टी-२० विश्वचषकात इटालियन संघ पाहून रोहित शर्मा आश्चर्यचकित; म्हणाला...



मुंबई-भारत आणि श्रीलंकेत संयुक्तपणे आयोजित होणाऱ्या आयसीसी टी-२० क्रिकेट विश्वचषक २०२६ चं वेळापत्रक अखेर जाहीर झालं आहे. २५ नोव्हेंबर रोजी मुंबईत झालेल्या एका कार्यक्रमादरम्यान, आयसीसीनं वेळापत्रक जाहीर केलं, पहिला सामना ७ फेब्रुवारी रोजी आणि अंतिम सामना ८ मार्च रोजी अहमदाबाद येथील नरेंद्र मोदी स्टेडियम वर होणार आहे. यावेळी पुन्हा एकदा एकूण २० संघ सहभागी होत आहेत, ज्यांना प्रत्येकी पाच गटात विभागलं गेलं आहे. इटली हा त्या संघांपैकी एक आहे ज्यानं पहिल्यांदाच या मोठ्या आयसीसी स्पर्धेत आपलं स्थान निश्चित केलं आहे. अशातच माजी भारतीय कर्णधार रोहित शर्मानेही इटालियन संघाबाबत महत्त्वपूर्ण विधान केलं आहे.
मला इटालियन संघाचं आश्चर्य वाटतं : २०२४ मध्ये टीम इंडियाला ट्रॉफी मिळवून देणारा माजी भारतीय कर्णधार रोहित शर्मा याची आयसीसीने ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती केली आहे. मुंबईतील एका कार्यक्रम ादरम्यान, रोहित शर्मानं स्पर्धेबद्दल अनेक प्रश्नांची उत्तरं दिली आणि कबूल केलं की सहभागी होणारे सर्व संघ खूप चांगले आहेत आणि तुम्ही कोणालाही हलक्यात घेण्याची चूक करु शकत नाही. इटालियन संघाबाबत रोहित म्हणाला, मफ्त्यांच्या कामगिरीनं मी खूपच आश्चर्यचकित झालो आहे. भविष्यात युरोप, आफ्रिका आणि आग्नेय आशियातील आणखी संघ पाहण्याची मला आशा आहे, जे या खेळासाठी एक मोठं प्रोत्साहन असेल.फ्फ
यावेळी पुन्हा ट्रॉफी जिंकू, रोहितचा विश्वास : टीम इंडियाबद्दल विचारलेल्या प्रश्नाच्या उत्तरात रोहित शर्मा म्हणाला, मफ्मला आशा आहे की आमचे खेळाडू गेल्या वर्षी मैदानावर दाखवलेल्या जादूची पुनरावृत्ती करु शकतील. आयसीसी ट्रॉफी जिंकणं कधीच सोपं नसतं. मी माझ्या १८ वर्षाच्या कारकिर्दीत फक्त दोन ट्रॉफी जिंकू शकलो आहे.फ्फ टीम इंडिया या स्पर्धेतील पहिला सामना ७ फेब्रुवारी रोजी अमेरिकेविरुद्ध खेळेल आणि त्यानंतर १५ फेब्रुवारी रोजी पाकिस्तानशी सामना होईल. टी-२० विश्वचषकाच्या इतिहासात आतापर्यंत कोणताही संघ आपलं जेतेपद राखू शकलेला नाही.
भारताचे ऊ२० विश्वचषक सामने कधी? : या विश्वचषकासाठी भारत आणि पाकिस्तानला एकाच गटात ठेवण्यात आलं आहे. त्यांच्यातील पहिला सामना १५ फेब्रुवारी रोजी होईल. विश्वचषकात खेळणाऱ्या सर्व २० संघांना चार गटात विभागण्यात आलं आहे, प्रत्येक गटात पाच संघ आहेत. या विश्वचषकातील भारताचा पहिला सामना ७ फेब्रुवारी रोजी भारत आणि अमेरिका यांच्यात खेळला जाईल. भारताचा दुसरा सामना १२ फेब्रुवारी रोजी नामिबियाविरुद्ध होईल. १५ फेब्रुवारी रोजी भारत आणि पाकिस्तान यांच्यात तिसरा सामना होईल. टीम इंडिया १८ फेब्रुवारी रोजी नेदरलँड्सविरुद्ध गटातील शेवटचा सामना खेळेल.

# महापारेषणमध्ये संविधान दिवस साजरा
## संविधानाच्या उद्देशिकेचे अधिकाऱ्यांनी केले सामूहिक वाचन





**मुंबई/प्रतिनिधी** : महाराष्ट्र राज्य विद्युत पारेषण कंपनीमध्ये (महापारेषण) भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन करून संविधान दिवस साजरा करण्यात आला.

सुरूवातीला महापारेषणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक डॉ. संजीव कुमार (भा.प्र.से.) यांच्या उपस्थितीत अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संविधानाच्या उद्देशिकेचे सामूहिक वाचन केले.

यावेळी संचालक (प्रकल्प) श्री. अविनाश निंबाळकर, संचालक (वित्त) श्रीमती तृप्ती मुधोळकर, मुख्य अभियंता श्रीमती जुईली वाघ, श्री. अमित नाईक, मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. नागसेन वानखेडे, महाव्यवस्थापक (मानव संसाधन) श्री. राजू गायकवाड, महाव्यवस्थापक (वित्त व लेखा) श्रीमती सीमा डुबेवार, मुख्य विधी सल्लागार श्री. विजय पाटील, मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी श्री. भरत पाटील, उपमुख्य दक्षता अधिकारी श्री. किशोर पाटील, श्री. प्रशांत गोरडे, शिष्टाचार अधिकारी श्री. सतिश जाधव यांच्यासह विविध अधिकारी व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातुरात संविधान सन्मान भव्य ५०० फूट तिरंगा रॅली संपन्न



**लातूर/प्रतिनिधी** : भारतीय संविधान अमृत महोत्सव वर्ष आणि संविधान दिना निमित्त संविधान सन्मान समिती, यांच्या वतीने शहरात भव्य ५०० फूट लांबीच्या संविधान सन्मान तिरंगा ध्वज रॅलीचे आयोजन करण्यात आले. पु. भिक्खू पय्यानंद थेरो यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेली ही रॅली उत्साहात आणि देशभक्तीच्या भावनेने ओतप्रोत भरलेली होती.

रॅलीचा शुभारंभ भिक्खू पय्यानंद थेरो, भंते बोधिराज, जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, जिल्हा पोलीस अधीक्षक अमोल तांबे, महानगरपालिकेच्या आयुक्त मानसी मीना, तसेच समाज कल्याण उपायुक्त अविनाश देवसटवार सह आयुक्त यादव कांबळे यांच्या हस्ते हिरवा झेंडा दाखवून करण्यात आला. रॅलीची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर पार्क येथून होत संविधान चौक येथे समारोप करण्यात आला. शहरातील विविध विद्यालयांमधील विद्यार्थ्यांनी पथनाट्य, झांज पथक, तसेच महापुरुषांच्या वेशभूषेत आकर्षक प्रात्यक्षिके सादर करून रॅलीला विशेष रंगत आणली. ५०० फूट तिरंग्याखाली निघालेली ही रॅली नागरिकांचे विशेष लक्ष वेधून घेत होती.

संविधान चौकात बोलताना पु.भिक्खू पय्यानंद थेरो म्हणाले, या अमृत महोत्सवी वर्षात आपण सर्वांनी एकच संकल्प करायला हवा भारतीय संविधानावरील निष्ठा कधीही ढळू देणार नाही, संविधानातील मूल्ये आपल्या आचरणात आणू, आणि प्रत्येक नागरिकापर्यंत संविधानाची जागृती पोहोचवू. शासनानेही संविधान वर्ष अधिक व्यापक पातळीवर जनसहभागातून साजरे करावे, संविधानाचे महत्त्व घरोघरी पोहोचवावे व युवकांना लोकशाही मूल्यांची भक्कम जाण निर्माण करून द्यावी. आजची रॅली हा त्याच जागृतीचा एक सुंदर प्रारंभ आहे. आपण सर्वजण संविधानाचे संरक्षक आहोत आणि ही जबाबदारी अभिमानाने पार पाडली पाहिजे.

रॅलीचा समारोप संविधान चौकात संविधान उद्देशिका वाचन आणि राष्ट्रगीताने करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. यु. डी. गायकवाड यांनी केले, तर आभार निलेश बनसोडे यांनी मानले.या रॅलीमध्ये कालिदास माने,बसवंत उबाळे, सुशील चिकटे, डॉ विजय अजनीकर, अशोक देडे, शोभा सोनकांबळे, आशा चिकटे,विशाल वाहुळे, प्रा सतिश कांबळे, उत्तम कांबळे, सुरेश सोनकांबळे मिलिंद धावारे, आदीजन शहरातील विविध क्षेत्रातील विविध शाळांचे विद्यार्थी, संविधानप्रेमी नागरिक, तसेच महाविहार धम्मसेवक ग्रुपचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

*************

## मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने संविधान प्रस्तावनेचे वाचन करुन संविधान दिन साजरा






**सोलापूर/प्रतिनिधी** : मध्य रेल्वेच्या सोलापूर विभागाने भारतीय संविधानात समाविष्ट असलेल्या मूलभूत मूल्यांप्रती असलेल्या आपल्या सामूहिक वचनबद्धतेची पुष्टी करत संविधान दिन २०२५ मोठ्या सन्मानाने आणि देशभक्तीच्या उत्साहाने साजरा केला.

सदरचा केंद्रीय कार्यक्रम सकाळी ११:०० वाजता सोलापूर डीआरएम कार्यालयाच्या आवारात आयोजित करण्यात आला होता. विभागीय रेल्वे व्यवस्थापक डॉ. सुजित मिश्रा यांनी भारतीय संविधानाच्या प्रस्तावनेचे वाचन करून या कार्यक्रमाची सुरुवात केली. त्यानंतर, उपस्थित सर्व अधिकारी आणि कर्मचारी न्याय, स्वातंत्र्य, समानता आणि बंधुत्वाच्या तत्त्वांचे पालन करण्यासाठी एकता आणि सामायिक संकल्पाचे प्रतीक असलेल्या सामूहिक वाचनात सहभागी झाले.

मुख्य कार्यक्रमासोबतच, संपूर्ण सोलापूर विभागात संविधान दिन साजरा करण्यात आला. आगार प्रमुख आणि युनिट प्रभारींनी त्यांच्या संबंधित कामाच्या ठिकाणी प्रस्तावना-वाचन सत्रांचे आयोजन केले, ज्यामुळे आगार, युनिट आणि कार्यशाळांमधील कर्मचाऱ्यांचा व्यापक सहभाग सुनिश्चित झाला. विभागातील या वाचनांनी या दिवसाचे महत्त्व अधोरेखित केले आणि रेल्वे कर्मचाऱ्यांमध्ये संवैधानिक मूल्यांबद्दल जागरूकता वाढवली.

२६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधान सभेने भारतीय संविधान स्वीकारल्याच्या स्मरणार्थ दरवर्षी २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा केला जातो. सोलापूर विभागाने हा दिवस साजरा केल्याने संवैधानिक जागरूकता, राष्ट्रीय अभिमान आणि जबाबदार नागरिकत्वाची संस्कृती जोपासण्याची त्यांची सततची वचनबद्धता दिसून येते.

## रेणापूरात भाजपानेच विकास कामे केली भाजपालाच मत देणार: मतदारांची भावना





**लातूर/प्रतिनिधी** : रेणापूर नगरपंचायत निवडणुकीत भारतीय जनता पक्षाला मतदारांचा उत्स्फूर्त पाठिंबा लाभत आहे. रेणापूर शहरात विकासाची कामे भाजपानेच केली असून शहराच्या प्रगतीसाठी आणि हितासाठी भाजपाशिवाय पर्याय नाही. भाजपला मत म्हणजे विकासाला मत, अशा भावना नगराध्यक्षापदाच्या भाजपाच्या उमेदवार श्रीमती शोभाताई आकनगिरे यांच्याशी बोलताना मतदार बंधू भगिनी व्यक्त करत आहेत.

रेणापूर नगरपंचायतीच्या निवडणुकीत लातूर ग्रामीणचे आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वात भाजपाच्या नगराध्यक्षपदाच्या उमेदवार श्रीमती शोभाताई आकनगिरे यांनी बुधवारी सकाळी सेवादास नगर, काळेवाडी, संजय नगर, संभाजीनगर, राजे नगर या भागात प्रचार पदयात्रा काढून मतदारांशी संवाद साधला. घरोघर जाऊन मतदारांच्या भेटी घेतल्या. ठिकठिकाणी महिलांनी त्यांना औक्षण केले. अनेक ठिकाणी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार शोभाताई आकनगिरे यांच्यावर पुष्पवृष्टी करण्यात आली.

यावेळी मतदारांनी रेणापुर शहरातील विविध विकासाची कामे, विविध प्रभागाचा विकास भाजपाच्या नेतृत्वामुळे झाल्याचे श्रीमती आकनगिरे यांच्याशी बोलताना सांगितले. सेवादास नगर या परिसरात नगरपंचायतीत भाजपाची सत्ता आल्यानंतर गटारी आणि रस्त्यांची कामे मोठ्या प्रमाणात झाली. तांड्यातील बहुतांश सर्व रहिवाशांना प्रधानमंत्री आवास योजनेतून घरे मिळाली. कुडाच्या घरात राहणाऱ्यांना आरसीसी सिमेंट कॉंक्रीटच्या घरात राहायला मिळाले असल्याचे समाधान अनेक मतदारांनी बोलून दाखविले.

काळेवाडी भागात महिलांनी शोभाताईंना भेटण्यासाठी शेकडोंच्या संख्येने गर्दी केली होती. नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार श्रीमती शोभाताई आकनगिरे यांनी गावातील देवीचे मंदिर, विठ्ठल रुक्मिणी मंदिर, खंडोबा मंदिर येथे दर्शन घेतले. रहिवाशांशी चर्चाही केली. ठिकठिकाणी महिलांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले.

रेणापूर शहरात मुख्य रस्त्यालगत असणाऱ्या संजय नगर, संभाजीनगर व राजे नगर या परिसरातही मतदारांशी संवाद साधण्यासाठी प्रचार फेरी काढण्यात आली. या परिसरात राहणाऱ्या नागरिकांनी आपल्या भावना व्यक्त करताना रेणापूर नगरपंचायतीत पुन्हा एकदा भाजपाची सत्ता आणण्याचा निर्धार श्रीमती आकनगिरे यांच्याशी बोलताना व्यक्त केला.

या पदयात्रेदरम्यान भाजपाच्या उमेदवार सुनिता मधुकर बस्तापुरे, खैरूनिसा मारूफ आतार यांच्यासह पदाधिकारी, कार्यकर्ते, नागरिक, युवक, मतदार आणि कार्यकर्त्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## संविधान म्हणजे देशातील नागरिकांचे सुरक्षा कवच : अजित पाटील कव्हेकर



**लातूर/प्रतिनिधी** :जगातील सर्वात मोठी लोकशाही आपल्या देशात नांदत आहेत. लोकशाहीला बळकट करण्याचे काम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानाच्या माध्यमातून केले आहे. देशातील समता एकता संविधानामुळे अबाधित असल्याचे सांगून संविधान म्हणजे देशातील नागरिकांचे सुरक्षा कवच असल्याचे प्रतिपादन लातूर शहर भाजपा जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर यांनी केले आहे.

लातूर शहरातील महात्मा गांधी चौकात असलेल्या पक्ष कार्यालयात शहर जिल्हा भाजपाच्या वतीने संविधान दिनानिमित्त उद्देशीकेचे वाचन करण्यात आले. यावेळी शहर जिल्हाध्यक्ष अजित पाटील कव्हेकर बोलत होते. याप्रसंगी शहर निवडणूक प्रमुख डॉ. अर्चना पाटील चाकूरकर, सरचिटणीस निखील गायकवाड, संजय गीर, प्रविण कस्तुरे, अनुसूचित जाती मोर्चाचे अध्यक्ष ॲड. पवन आल्टे , विनय जाकते, भरत लोंढे, आतिश कांबळे आदींची प्रमुख उपस्थिती होती.

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर व त्यांच्या सहकार्यांनी २६ नोव्हेंबर १९४९ रोजी संविधानाची निर्मिती केली असल्याचे सांगून अजित पाटील कव्हेकर म्हणाले कि या संविधान निर्मितीला आज ७५ वर्षे पुर्ण झाली आहेत. जगातील सर्वात मोठी लोकशाही भारत देशात नांदत असून या लोकशाहीला अधिक बळकट करण्याचे काम संविधानामुळे झाले आहे. संविधानाने देशातील प्रत्येक नागरिकाला वेगवेगळे हक्क मिळालेले असून या हक्कांमुळे देशातील समता व एकता अधिक दृढ झाली आहे. संविधानाने जसे हक्क दिले आहे तसे काही कर्तव्य हि पार पाडण्यास सांगितले आहे. या कर्तव्यांच्या माध्यमातून संविधानाला अपेक्षित असणारी सामाजिक समरसता निर्माण करण्यासाठी पक्षाच्या प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आपले योगदान देणे आवश्यक असल्याचे स्पष्ट केले.

संविधानामुळेच देशाच्या पंतप्रधान पदापर्यंत नरेंद्र मोदी पोहचले असल्याचे सांगून अजित पाटील कव्हेकर म्हणाले कि संविधानाची हि ताकद कोणीच नाकारू शकत नाही. त्यामुळेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी संविधाना प्रति आपली कृतज्ञता व्यक्त केली आहे. संविधानात बदल करण्यात येणार असा अपप्रचार करणाऱ्यांना चपराक देण्याचे काम देशातील नागरिकांनी केलेले असून संविधानाच्या मुल्यांची जपणूक करत त्याचा उद्देश सफल करण्यासाठी भारतीय जनता पक्षाचा प्रत्येक पदाधिकारी व कार्यकर्ता सक्षमपणे आपले योगदान देईल अशी अपेक्षा अजित पाटील कव्हेकर यांनी यावेळी व्यक्त केली. संविधानामुळे देशातील प्रत्येक नागरिकाला जे वेगवेगळे हक्क मिळालेले आहेत ते हक्क म्हणजे सुरक्षा कवचच असल्याचे सांगून हे कवच अधिक भक्कम करण्यासाठी आपण सर्वजण आपले योगदान देऊ असे आवहान केले.

यावेळी सरचिटणीस निखील गायकवाड, आतिश कांबळे, बाबा गायकवाड, यांनी आपले मनोगत व्यक्त केले. सर्वप्रथम भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यानंतर संविधान उद्देशीकेचे सामुहिक वाचन करण्यात आले. या वेळी मंडल अध्यक्ष राहुल भुतडा, रोहित पाटील, अल्पसंख्याक मोर्चाचे अध्यक्ष मुन्ना हाश्मी, ॲड. दिपक मठपती, सुरेश राठोड, ज्योती रसाळ, शितल कुलकर्णी, आफरीन खान, ज्योती मारकडे, सिमा करपे, किशन बडगीरे, राजकुमार गोजमगुंडे, संतोष पांचाळ, गोविंद सूर्यवंशी, उदय देशपांडे, सागर घोडके, डॉ. संतोष जमदाडे, अरुण जाधव, आकाश बाभळे, अनिल कबाडे, ऋषिकेश पोतदार, आदींसह पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांचा बाभळगावात जन-संवाद; नागरिकांच्या समस्या ऐकून तात्काळ निवारणाच्या सूचना



**लातूर/प्रतिनिधी** : राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी आज सकाळी बाभळगाव निवासस्थानी लातूर शहर आणि जिल्हाभरातून आलेल्या विविध संस्था पदाधिकारी, कॉंग्रेस पक्षाचे पदाधिकारी आणि नागरिकांच्या भेटी घेतल्या.

यावेळी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी उपस्थित नागरिकांच्या अडीअडचणी व समस्या समजून घेतल्या आणि त्यांच्या निमंत्रणांचा स्वीकार केला. तसेच, संबंधितांना पुढील आवश्यक कार्यवाहीसाठी त्वरित सूचना केल्या.

यावेळी ललीतभाई शहा, लातूर शहर जिल्हा कॉंग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, माजी महापौर दीपक सूळ, विलास को-ऑपरेटिव बँक व्हाईस चेअरमन समद पटेल, ॲड. गोपळ बुरबुरे, कैलास कांबळे, अनुप मलवाड, इम्रान सय्यद, सचीन बंडापल्ले, कैलास पाटील, विजयकुमार धुमाळ, अमित जाधव, ॲड. फारुक शेख, सत्यवान कांबळे, दिनेश गोजमगुंडे, मनोज चिखले, अकबर माडजे, रोहीत बिराजदार, गणेश एसआर देशमुख, सागर मुसांडे, मुक्तार शेख, शितल मोरे, इसरार पठाण, अब्दूल्ला शेख, रणधीर सुरवसे, पवनकुमार गायकवाड, अजय चिखलीकर, मंजीत नरहरे, सत्तारभाई शेख, अविनाश बटेवार, राज क्षिरसागर, रजाउल्ला खान, अलीम शेख, भालचंद्र सोनकांबळे आदिसह कॉंग्रेस पक्ष व विविध संस्थाचे पदाधिकारी कार्यकर्ते, नागरिक उपस्थित होते.

एनएसयुआय जिल्हाध्यक्षपदी रोहीत बिराजदार यांची निवड झाल्याबद्दल माजी मंत्री, आमदार अमित देशमुख यांनी अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

## लातुरात दि. १६ ते १८ डिसेंबर दरम्यान दुसऱ्या अभिजात इंटरनॅशनल शॉर्ट फिल्म फेस्टिवलचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी** : अभिजात फिल्म सोसायटी व दयानंद शिक्षण संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने दुसरा अभिजात आंतरराष्ट्रीय लघु चित्रपट महोत्सव दि.१६, १७ व १८ डिसेंबर २०२५ रोजी लातूर येथील दयानंद सभागृह येथे आयोजित करण्यात आला आहे. गतवर्षीप्रमाणे याही वर्षी चित्रपती व्ही.शांताराम यांच्या नावाने या महोत्सवातील विजेत्या लघुपटास प्रथम पारितोषिक देण्यात येणार असून लघुपट निर्मितीच्या इतर एकूण २५ विभागात वेगवेगळी पारितोषिके देण्यात येणार आहेत. या स्पर्धेत माहितीपट, ॲनिमेशन आणि व्हिडीओ साँग्सचा देखील समावेश असणार आहे.

यंदा भारत, युनायटेड स्टेट्स, युनायटेड किंगडम, जर्मनी, स्पेन, इटली, रशिया, मलेशिया, कॅनडा, ऑस्ट्रिया, सौदी अरेबिया आणि इराण इ. देशातून मराठी, हिंदी, इंग्रजी, मालवणी, तेलुगू, तमिळ, बंगाली, कन्नड, आसामीस, मल्ल्याळम, पंजाबी, राजस्थानी, इटालियन, जर्मन, टर्किश, स्पॅनिश, चायनिज(कँटोनीज), रशियन, कॅटलन, फ्रेंच या भाषांमधून सुमारे २५० लघुपटांनी सहभाग नोंदवलेला असून यातील निवडक ८० लघुपट या महोत्सवात दाखवण्यात येणार आहेत. या महोत्सवाचे परिक्षक म्हणून संतोष पाठारे आणि रघुनाथ फडणीस हे ज्येष्ठ समीक्षक काम बघणार आहेत.या महोत्सवात लघुपट निर्मिती तंत्राबरोबरच इतर विषयांवर अभ्यासपूर्ण व्याख्याने व परिसंवाद देखील होणार आहेत. लघुपटनिर्मितीसाठी इच्छुक लेखक-दिग्दर्शकांसाठी निर्मिती सहकार्य करण्यासाठी व त्यांच्या संकल्पनांना पाठबळ देण्यासाठी पीच टँक हा आगळा उपक्रम यानिमित्ताने राबवण्यात येणार आहे. नि:शुल्क असलेल्या या महोत्सवाचा लातूरकर रसिक प्रेक्षकांनी मोठ्या संख्येने लाभ घेण्याचे आवाहन अभिजात फिल्म सोसायटीचे जितेंद्र पाटील, प्रा डॉ. विश्वास शेंबेकर, डॉ. स्वप्नील देशमुख आणि धनंजय कुलकर्णी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.



शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडेऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# सुरक्षित सुंदर शहरासाठी, रेणापूरकरांनी नगरपंचायत काँग्रेसच्या ताब्यात द्यावी

## ➤ माजी आमदार धिरजभैया देशमुख यांचे मतदारांना आवाहन
## ➤ काँग्रेसच्या प्रचार बैठकीला मतदारांचा मोठा प्रतिसाद

**लातूर/प्रतिनिधी:** रेणापूर नगरपंचायती मध्ये मागील आठ वर्षापासून सत्ताधारी असलेल्या भाजपकडून अतिशय भ्रष्ट कारभार झाला त्याला जनता कंटाळली असून रेणापुर नगरपंचायतीमध्ये आता बदल हवा आहे अशी भावना मतदारांची झाली आहे आजतागायत काँग्रेस पक्षाने नेहमीच विकासाचे राजकारण केले आहे त्यामुळे सुरक्षित, सुशिक्षीत आणि सुंदर शहरासाठी रेणापुरकरांनी काँग्रेस पक्षाला भरभरून साथ द्यावी व येत्या २ डिसेंबर रोजी होणाऱ्या नगराध्यक्ष नगरसेवक पदासाठी उभे असलेल्या सर्व काँग्रेस उमेदवारांना प्रचंड मताने विजयी करा असे आवाहन लातूर ग्रामीणचे माजी आमदार



तथा जिल्हा बँकेचे चेअरमन धिरज विलासराव देशमुख यांनी केले आहे ते रेणापूर नगर पंचायत निवणुकीच्या निमित्ताने शहरातील बुधवारी हाके तांडा नेहरू नगर राजेवाडी येथे काँग्रेस पक्षाचे उमेदवार अजय कुमार चक्रे गणेश ठावरे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार सौ अर्चना प्रदीप माने यांच्या प्रचारार्थ संवाद बैठक आयोजित करण्यात आली होती त्यावेळी ते बोलत होते दरम्यान संवाद बैठकीला मतदारांचा मोठा प्रतिसाद मिळाला आहे

मागच्या पाच वर्षात भाजपने मतदारांचा भ्रमनिरास केला

यावेळी माजी आमदार धीरज विलासरावजी देशमुख मतदारांशी संवाद साधत असताना ते पुढे म्हणाले की, मागच्या वेळी नगरपंचायत निवडणुकीत मतदारांनी भाजपच्या लोकांना सत्ता दिली मात्र त्या सत्तेचा वापर नागरिकांसाठी न करता स्वतः व जवळच्या लोकांसाठी त्यांनी वापर केला त्यामुळे नागरिकांच्या मूलभूत गरजा पूर्ण होऊ शकल्या नाहीत. त्यामुळें मतदारांचा भ्रमनिरास झालेला आहे याविषयी मतदारांमध्ये प्रचंड रोष निर्माण झाला असून आता काँग्रेस शिवाय पर्याय नाही अशी भावना मतदारांची झाली आहे. त्यामुळे रेणापूर नगरपंचायत काँग्रेस नागरिकांच्या सर्वांगीण विकासासाठी काँग्रेस उमेदवारांना प्रचंड मतांनी विजयी करावे अशी विनंती माजी आमदार धिरज विलासराव देशमुख यांनी केली

यावेळी काँग्रेसचे उमेदवार, पक्ष निरीक्षक, कोंग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते व नागरीक मतदार पुरुष महिला जेष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## लातूर रक्तदान महोत्सवात विक्रमी कामगिरी; संविधान दिनानिमित्त तब्बल ६०२ बॅग रक्तसंकलन



**लातूर/प्रतिनिधी:** संविधान दिनाचे औचित्य साधत लातूर जिल्हा वकील मंडळ व शहरातील नामांकित अकरा संस्थांनी एकत्र येत 'रक्तवीर लातूर गौरव लातूर' या प्रेरणादायी ब्रीदवाक्याखाली भव्य लातूर रक्तदान महोत्सव २०२५ आयोजित केला. या महोत्सवात तब्बल ६०२ रक्तबॅगचे अभूतपूर्व संकलन होत लातूरकरांनी ऐतिहासिक विक्रम रचला.

कार्यक्रमाचे अध्यक्षपद जिल्हा वकील मंडळाचे अध्यक्ष ॲड. वाय. डी. जगताप यांनी भूषवले. उद्घाटन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश संजय भारूका साहेब यांच्या हस्ते झाले. प्रमुख पाहुण्या म्हणून जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे या उपस्थित होत्या. तसेच जिल्हा न्यायमूर्ती आर. आर. भोसले, एस. व्ही. त्रिपाठी, एस.व्ही.जाधव विधीसेवा प्राधिकरणाचे सचिव व्ही.एन.गिरवलकर एचडीएफसी बँकेचे दत्तात्रय महाबळ ,पत्रकार संघाचे सचिव दत्तात्रय परळकर, नागनाथ गित्ते, विक्रमी रक्तदाता पारस चापसी आदी मान्यवरांनी उपस्थिती दर्शवली.

जिल्हा न्यायाधीश भारूका यांनी लातूर जिल्हा वकील मंडळ व साप्ताहिक पत्रकार संघाचे विशेष कौतुक करत सर्व आयोजक संस्थांचे अभिनंदन केले. अशा उपक्रमांची गरज समाजाला आहे असे मत जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी व्यक्त केले.

महोत्सव स्थळी खासदार डॉ.शिवाजी काळगे, डॉ.अर्चना पाटील चाकूरकर, अजित पाटील कव्हेकर यांनी भेट देऊन उपक्रमाचे कौतुक केले.

या भव्य महोत्सवाच्या यशात लातूर जिल्हा वकील मंडळ, लातूर जिल्हा न्यायिक अधिकारी व विधी सेवा प्राधिकरण, लातूर जिल्हा साप्ताहिक पत्रकार संघ, लातूर,लातूर जिल्हा न्यायालयीन कर्मचारी संघ, लायन्स क्लब ऑफ सिटी, लातूर, विद्यार्थी कृती हक्क समिती, अखिल भारतीय अधिवक्ता परिषद, लातूर, लातूर ब्लड बँक अमूल दूध, द न्यू इंडिया इन्शुरन्स,एचडीएफसी बँक यांसह सर्व संस्थांच्या कार्यकर्त्यांचे मोलाचे योगदान लाभले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक ॲड गणेश गोजमगुंडे यांनी केले. सूत्रसंचालन ॲड. इरफान शेख आणि ॲड. निलेश मुचाटे यांनी केले तर आभार संजय राजुळे यांनी मानले. लातूरकरांच्या या समाजहितैषी पुढाकाराने रक्तदान संस्कृतीला नवा आयाम मिळाला असून ६०२ बॅग संकलनाचा हा विक्रम लातूरच्या इतिहासात महत्वाची नोंद ठरला आहे.

# 'केशवराज'मध्ये विविध उपक्रमांनी संविधान दिन साजरा

**लातूर/प्रतिनिधी:** येथील श्री केशवराज माध्यमिक विद्यालयात दि. २६ नोव्हेंबर २०२५ बुधवार रोजी संविधान दिन विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता, डॉ. बाबासाहेब आंबेडकर व भारतीय संविधानाची प्रत यांच्या पूजनाने करण्यात आली. याप्रसंगी मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, कार्यक्रमाच्या प्रमुख वक्त्या तथा भारतीय स्त्रीशक्ती शाखा लातूरच्या सदस्या डॉ. शैलजा हासबे, भारतीय स्त्रीशक्ती शाखा लातूरच्या राष्ट्रीय सदस्या अनघा अंधोरीकर, भारतीय स्त्रीशक्तीच्या शाखा लातूरच्या उपाध्यक्षा प्रेमाताई बाहेती, विद्यालयाच्या पर्यवेक्षिका राजश्री कुलकर्णी यांची उपस्थिती होती.

याप्रसंगी विषय मांडणी करताना प्रमुख वक्त्या शैलजा हासबे यांनी संविधानाची रचना सांगितली. विद्यार्थ्यांना संविधानातील आपल्या कर्तव्यांची ओळख करून दिली. देशाचे उत्तम नागरिक म्हणून जबाबदारीने कार्य पार पाडावे, स्वच्छतेची नैतिक जबाबदारी पार पाडावी, राष्ट्रीय मालमत्तेचा आदर करावा, महिलांचा आदर करावा, ६ ते १४ वयोगटातील प्रत्येकापर्यंत शिक्षण पोहोचावे, अशा अनेक कर्तव्यांची माहिती याप्रसंगी त्यांनी दिली.

अध्यक्षीय समारोपात विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे यांनी विद्यार्थ्यांना परिश्रम केले तरच यशस्वी व्हाल असे सांगितले. देशाचे भावी नागरिक या नात्याने भारतीय संविधानाचे सर्वांनी वाचन केले पाहिजे, असे आवाहन करून 'हा देश माझा याचे भान जरासे राहू द्या' असे मत मांडले

याप्रसंगी विद्यालयातली इ. ९ वी अ वर्गातील विद्यार्थ्यांनी संविधानावर आधारित तयार



केलेल्या भित्तिपत्रकाचे मान्यवरांच्या हस्ते अनावरण करण्यात आले. तसेच शासन परिपत्रकानुसार संविधान दिनानिमित्त विद्यालयात संविधान प्रभात फेरी, संविधानावर आधारित प्रश्नमंजुषा, चित्रकला प्रदर्शनी, मानवी साखळी या विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक, परिचय व स्वागत विद्यालयातील ज्येष्ठ शिक्षक जितेंद्र जोशी यांनी केले. संगीत शिक्षक संतोष बीडकर यांनी 'यह कल कल छल छल बहती गंगा धारा' हे देशभक्तीपर गीत सादर केले.

सूत्रसंचालन व आभारप्रदर्शन वनमाला कलुरे यांनी केले तर विष्णू इरळे यांच्या संविधानाच्या उद्देशकेने कार्यक्रमाची सांगता झाली.

ज्ञानोपासक मंडळांतर्गत संपन्न झालेल्या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विद्यालयाचे मुख्याध्यापक बालासाहेब केंद्रे, केंद्रीय विद्यासभा संयोजक तथा विद्यालयाचे उपमुख्याध्यापक महेश कस्तुरे, पर्यवेक्षक राजश्री कुलकर्णी, धनंजय कुलकर्णी यांच्या मार्गदर्शनाखाली अभ्यासपूरक मंडळ प्रमुख रेणुका गिरी, ज्ञानोपासक मंडळ प्रमुख श्रीमती तेजस्विनी सांजेकर, कार्यक्रम प्रमुख अश्विनी स्वामी, संविधान दिनानिमित्त घेण्यात आलेल्या विविध उपक्रमांचे प्रमुख व्यंकटेश माने, प्रयागराज गरुड, अशोक रायते, अमोल गायकवाड, सुवेद सूर्यवंशी तसेच व्यवस्थेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परिश्रम घेतले.

## लगाम ..

नाराजीच्या चर्चेना
दिधला पूर्ण विराम
खुर्ची खूप उबवली
आता करा आराम

क्षीण झाली शक्ती
भरपूर तुडुंब काम
कामाचे नावाखाली
खाई अक्रोड बदाम

प्रकरणे नेमकी येई
करे पक्षाले बदनाम
किती स्वच्छ करावे
थकून गेलेत हमाम

कितीदा लाँचकरावे
उपाय फसले तमाम
नव शिक्या वशिल्या
परिपक्क करे सलाम

श्रेष्ठीच्या कुटूंबातले
बने म्हणून सरंजाम
दुस-याच्या खांद्यावर
समस्त तुझे इल्जाम

नवनवे तव कारनामे
शिक्षेला फुटला घाम
प्रत्येककोर्टात केसेस
आरोपांची गर्दी जाम

मार्ग दर्शकपदी वर्णी
सुयोग्य दिधले इनाम
उधळ कसेही चौफेर
अदृश्यहातात लगाम

**हेमंत मुसरीफ पुणे.**
९७३०३०६९९६.

# स्वयंसेवी संस्थांच्या सहकार्यातून होणार उद्यानांचा विकास

## आयुक्त श्रीमती मानसी यांच्या संकल्पनेला संस्थांचे पाठबळ

**लातूर/प्रतिनिधी:** विविध स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून शहरातील ग्रीन बेल्टमध्ये उद्यानांचा विकास करण्याची संकल्पना मनपा आयुक्त श्रीमती मानसी यांनी मांडली.विविध संस्थानी त्यास पाठबळ दिले असून यामुळे शहरात आता उद्यानांचा विकास गतीने होणार आहे.

नागरिकांचे आरोग्य सुदृढ रहावे यासाठी शहरात उद्याने असणे गरजेचे आहे. पर्यावरणाच्या रक्षणासाठी देखील उद्यानांची आवश्यकता आहे. त्यामुळे शहरात उद्याने विकसित करण्यासाठी काय करता येईल? याची आयुक्त श्रीमती मानसी यांनी बुधवारी विविध ग्रीन बेल्टला भेटी देऊन पाहणी केली.या जागेवर उद्याने विकसित करण्याची संकल्पना त्यांनी मांडली. ही कल्पना मांडताच स्वयंसेवी संस्थानी त्यास पाठबळ व्यक्त केले.मनपाने त्यांना सहकार्य करण्याची ग्वाही



दिली.

या माध्यमातून शहरात एकूण ७ ग्रीन बेल्ट विकसित केले जाणार आहेत.मनपा स्वतः ३ ग्रीन बेल्ट विकसित करणार आहे. यामुळे आगामी काही दिवसात शहरातील ग्रीन बेल्ट मध्ये उद्याने विकसित झालेली दिसून येणार आहेत.त्यामुळे शहरातील पर्यावरण संवर्धन होण्यास मदत होणार असून शहराचा चेहरा-मोहरा बदलला जाणार आहे. पाहणीवेळी उद्यान विभाग प्रमुख समाधान सुर्यवंशी उपस्थित होते.

# मुलींनी स्वयं संरक्षणाचे धडे घेतले पाहिजेत

## किलबिल नॅशनल स्कूलमधील कार्यक्रमात स्मिता जाधव यांचे प्रतिपादन

**अहमदपूर/प्रतिनिधी:** समाजात वाढत्या लैंगिक अत्याचारांच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थिनींनी आत्मसंरक्षण कौशल्य आत्मसात करणे अत्यंत गरजेचे असल्याचे प्रतिपादन पोलिस उपनिरीक्षक स्मिता जाधव यांनी केले.

येथील किलबिल नॅशनल स्कूलमध्ये इनरव्हील क्लब अहमदपूर आणि शहर पोलिस स्टेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मुलींमध्ये स्वयं संरक्षणा बाबत जनजागृती करण्याचा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी मार्गदर्शिका म्हणून उपस्थित असणाऱ्या स्मिता जाधव बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी इनरव्हील क्लबच्या अध्यक्षा सौ. पूजा रेड्डी होत्या. सचिव रजनी महाजन, कोषाध्यक्षा पल्लवी हेंगणे, सुनीता गुणाले, कलावती भातांब्रे, संस्थेचे सचिव ज्ञानोबा



भोसले, प्राचार्य संतोष पाटील आदी मान्यवर या कार्यक्रमाला उपस्थित होते.यावेळी बोलताना स्मिता जाधव म्हणाल्या की, लहान मुलींवर होत असलेल्या अत्याचारांना आळा घालण्यासाठी पोलीस यंत्रणा प्रयत्नशील आहे. मात्र समाजातील प्रत्येक घटकानेही आपली जबाबदारी ओळखणे आवश्यक आहे. पालकांनी आपल्या मुलींना लहानपणापासून जागरूकता आणि स्वयं संरक्षणाचे प्राथमिक धडे दिले पाहिजेत, असे त्या म्हणाल्या.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक संस्थेचे सचिव ज्ञानोबा भोसले यांनी केले. सूत्रसंचालन आजरा औरादवाले, तेजस्वी मुळे आणि सचिन जगताप यांनी कौशल्यपूर्ण पद्धतीने पार पाडले. शेवटी आभार प्रदर्शन अफरीन शेख यांनी केले.कार्यक्रमास शाळेतील सर्व विद्यार्थिनींसह महिला शिक्षकवृंद उपस्थित होता. महिलांचे सबलीकरण आणि आत्मसंरक्षणाबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी आयोजित केलेल्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून होत आहे.

प्रत्येक स्त्री स्वतःच्या पायावर उभी राहून सक्षम व्हावी १३ ते १८ वर्षे वयोगटातील मुली या टप्प्यावर अधिक संवेदनशील असतात. शाळांनी मुलींना मैदानी खेळ, साहसी क्रीडा, कराटे, बॉक्सिंग आदी खेळांचे प्रशिक्षण दिल्यास त्यांचा आत्मविश्वास दुणावतो. प्रत्येक स्त्री स्वतःच्या पायावर उभी राहून सक्षम झाली, तरच समाजातील महिलांवरील अत्याचारांची संख्या कमी होऊ शकते, असे मान्यवरांनी सांगितले.

**मध्य रेल्वे**
**सोलापूर विभाग**
**बांधकाम कामे**

**ई-निविदा सूचना क्रमांक:-१६-२०२५-SrDENCo** डीआरएम (डब्ल्यू), मध्य रेल्वे, सोलापूर, आणि मा. भारताच्या राष्ट्रपतींच्या वतीने खालील कामांसाठी नामांकित कंपन्या/कंत्राटदारांकडून ई-निविदा मागवीत आहेत. **०१. कामाचे नाव:** १-एडीईएन/डब्ल्यू/एसयूआर उपविभाग अंतर्गत एसयूआर (प्रकार-III ०८ युनिट्स आणि प्रकारखत ०६ युनिट्स) येथे जुन्या क्वार्टरच्या जागी क्वार्टरचे बांधकाम. २-एडीईएन/केएलबीजी आणि एडीईएन/डब्ल्यू/एसयूआर उपविभाग अंतर्गत डब्ल्यूडी (प्रकार-III ०४ युनिट्स), एसडीबी (आरबी-II ४ युनिट्स आणि प्रकार-III ०२ युनिट), एमआर (प्रकारपेल ०४ युनिट्स) आणि एनजीएस (प्रकार-II ०४ युनिट्स) येथे जुन्या क्वार्टरच्या जागी क्वार्टरचे बांधकाम. ३- एडीईएन/डब्ल्यू/एसयूआर अंतर्गत एसयूआर (प्रकार-III ०८ युनिट्स), WDS (प्रकार-II ०४ युनिट्स), MA (प्रकार-II ०४ युनिट्स) आणि MVE (प्रकार-II ०४ युनिट्स) येथे नवीन क्वार्टरचे बांधकाम. ४- एडीईएन/डब्ल्यू/एसयूआर अंतर्गत HG (प्रकार-II ८ युनिट्स आणि प्रकार-III २ युनिट्स), DUD (प्रकार-II ४ युनिट्स) आणि AKOR (प्रकार-II ४ युनिट्स) येथे नवीन क्वार्टरचे बांधकाम. **०२. कामाची अंदाजे किंमत:** रु. १४,९८,५२,१२९.९९ **०३. बयाणा रक्कम** रु. ८,९९,३००.०० **०४. काम पूर्ण करण्याचा कालावधी:** १२ (बारा) महिने **०५. देखभाल कालावधी:** २४ (चोवीस) महिने **०६. निविदा फॉर्मची किंमत:** शून्य **०७. www.ireps.gov.in वेबसाइटवर निविदा सादर करण्याची तारीख आणि वेळ:** १६.१२.२०२५ रोजी १५.०० वा. ०८. www.ireps.gov.in वर १६.१२.२०२५ रोजी १५.३० वा. **निविदा उघडण्याची तारीख आणि वेळ. ०९. वेबसाइट तपशील: www.ireps.gov.in १०. टीप:** संभाव्य निविदाधारकांना निविदा बंद होण्याच्या तारखेपूर्वी वेबसाइट वारंवार भेट देण्याचा सल्ला देण्यात येतो जेणेकरून या निविदा वेबसाइटसाठी जारी केलेले कोणतेही बदल/शुद्धीपत्रक लक्षात येईल: www.ireps.gov.in. ANJ-67

परवानगीशिवाय रेल्वे रूळ ओलांडणे हा दंडनीय गुन्हा आहे.

**टोनर रिफिलिंग**
फक्त ₹ ३००/-
मास्टरप्लेट ट्रेसिंग क्वालिटी
संपर्क
8600025070
9028376965
**प्रिंटर्स पॅराडाईस**
प्रिंटर रिपेअरिंग
कॉम्पॅटिबल कार्ट्रिजेस
टोनर रिफिलिंग

निलंगा शहरातील एलआयसी विमा भरण्याचे केंद्र
**सितारी विमा सेवा केंद्र**
दु.नं.२३, इदगाह कॉम्प्लेक्स, जनता दवाखान्यासमोर शिवाजी चौक, निलंगा.
वेळ सकाळी ९ ते सायं. ९ पर्यंत
**जमीरोद्दीन सितारी**
चेअरमन क्लक मेंबर CLIA
एजंट भरती चालू आहे.
संपर्क Off: (02384) 242224, 9422612239, 9422658396

Printed and Published by Dayanand Shankar Jade on behalf of Latur Samachar and Printed at Jade Offset Printers Mitra Nagar Latur and Published at Mitra Nagar Latur.
Editor: Dayanand Shankar Jade Mo. 9422472502, RNI 47034/64, POSTAL NO. L2/RNP/OMD 52/24-26
हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक दयानंद शंकर जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून येथेच प्रकाशित केले आहे. मुख्यसंपादकः दयानंद शंकर जडे मो. ९४२२४७२५०२ आरएनआय ४७०३४/६४, पोस्टल क्र. एल२/आरएनपी/ओएमडी-५२/२४-२६